म. ग्रं. सं. ठाणें

३

विषय

८०

लेखक विनायक

सन

१८८०

ग्रंथ क्रमांक

३०
९२

पुस्तकाचें नांव नाटक थोरले माधवराव

ग्रं. सं. ठाणें
नाटक
दुर्मिळ

# नाटक, थोरले माधवराव पेशवे यांजवर.

राजश्री विनायक जनार्दन कीर्तने,
निसबत एल्फिन्स्टन् कॉलेज,
यांणीं रचून

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभे पुढें वाचिलें:
तें सभेच्या आज्ञेवरून

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

मुक्काम मुंबई.

किंमत ६ (साहा) आणे.

सन १८६१.

Hurry Vishwanath Patwardhan 28th Octo 1862

# नाटक,

## थोरले माधवराव पेशवे यांजवर.

राजश्री विनायक जनार्दन कीर्तने,

निसबत एल्फिन्स्टन् कॉलेज,

[illegible]ाराम निळकंठ पटवर्ध[illegible]

यांणीं रचून [illegible]णार्थ,

[illegible] [illegible]ालय ठाणें

नजर

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभे पुढें वाचिलें;

तें सभेच्या आज्ञेवरून

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

मुक्काम मुंबई.

किमत ६ ( साहा ) आणे.

सन १८६१.

# जाहिरात.

सर्व लोकांस जाहिर केलें जातें कीं जांस हा ग्रंथ घेण्याची इच्छा असेल त्यांणीं आपलें नाव व ठिकाण लिहून **ज्ञानप्रसारक** सभेचे चिटणीस राजश्री नारायण महादेव परमानंद यांचा नावें गणपत कृष्णाजी यांचें छापखान्यांत पोष्टपेड पत्रें पाठवावीं. तीं पुस्तकाची किंमत साहा आणे व बंगीचें हांशील एक आणा मिळोन सात आणे सुद्धां पाठवावीं ह्मणजे त्यांस हीं पुस्तकें पाठविलीं जातील.

हीं पुस्तकें पुण्यांत पाठशाळेंतील अशिष्टंट प्रोफेसर राजश्री बाळा मंगेश यांजपाशीं मिळतील.

रत्नागीरींत राजश्री श्रीधर नारायण जोशी वकील यांजपाशीं मिळतील. पुस्तकांचा पावत्या बाळाजी बापुजी साने यांचे नावाचा केल्या जातील.

# प्रस्तावना.

कांहीं दिवसां मागें मराठी ज्ञानप्रसारक सभेमध्यें रा० **विनायक जनार्दन कीर्तने** यांणीं **थोरले माधवराव साहेब** यांच्या कारकीर्दीचें वर्णन नाटकरूपानें लिहून वाचिलें. तें ऐकून सर्व सभेस फार आनंद झाला इतकेंच नाहीं, तर, राजमान्य रा० **डाक्तर भाऊदाजी** व रावसा० **महादेव गोविंद शास्त्रि** इत्यादिक विद्वान व थोर गृहस्थांच्या स्तुतीसही तें पात्र झालें. असें पाहून याचें लहानसें पुस्तक निराळेंच छापून प्रसिद्ध करावें असें बहुतेक सभासदांस व कित्येक इतर गृहस्थांस वाटल्यावरून, सर्व लोकांस तें सुलभ किमतींत मिळून मराठी नाटकांविषयीं अभिरुचि उत्पन्न व्हावी ह्या हेतूनें हें पुस्तक आम्हीं छापून प्रसिद्ध केलें आहे तर मराठी भाषेचें कल्याण इच्छिणाऱ्या सर्व लोकांनीं यास यथाशक्ति आश्रय द्यावा हें उचित आहे.

मराठी भाषेंत नाटकें लिहिण्याचा हा प्रारंभच असून या लहानशा नाटकांत नाटककारानें हास्य व करुणारस चांगले उतरून पुस्तक मनोरंजक केलें आहे हें पाहून नवीन ग्रंथकार नाटकसंग्रहानें आपली भाषा ऊर्जित दशेस आणण्यास उद्युक्त होतील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

या पुस्तकांत कोठें कोठें अडाणी लोकांची भा-

**विदूषक**— मग मी काय बोललों? तुला प्रयोजन आहे म्हणजे मेजवानी आहे, चल.

**सूत्रधार**— पुनः आपलेंच. अरे तुला प्रयोजन नव्हे, तुझें प्रयोजन आहे, चल. प्रयोजन म्हणजे कारण.

**विदूषक**— हंहं; आतां उमजलों. माझें कारण आहे काय? मग बरें आहे. काय म्हणतोस?

**सूत्रधार**— माझें साहित्य कर.

**विदूषक**— मी असा तुझ्यासारिखा दुतोंड्या नाहीं. प्रयोजन नाहीं ह्मणतोस, आणि साहित्य तर कर म्हणतोस. तुझें खरें काय समजावें? मी आपला निघोन जातों कसा. नाहींतर एक काय तें सांग.

**सूत्रधार**— साहित्य म्हणजे पापड, सांडगे, लाडू हें नव्हे, बाबा. साहित्य कर म्हणजे मदत कर. आज माझ्या दैवानें विदूषक तर मला फार विद्वान् मिळाला आहे.

**विदूषक**— असें काय तें काम माझें. तूं आतां काय करणार तें सांग म्हणजे त्या सारखी मदत.

**सूत्रधार**— ऐक तर सांगतों. हे श्रोतेहो, तुह्मीही ऐका. हे विदूषका, आज मी यालोकांना मराठी दरबारांत नेऊन तेथील हलहवाल दाखविणार. तें कोणतें मराठी दरबार जर ह्मणशील, तर, बाबा, आतांचें नव्हे. ज्या दरबारांत परद्वीपस्थ लोकांच्या आज्ञा चालतात, व राजे केवळ पिंजऱ्यांतील पोपट असून स्वसत्तेच्या छायेस देखील ओळखीत नाहींत, अशा ठिकाणीं मीं यांना कशासाठीं नेऊं? तर थोरले श्रीमंत माधव-
हेच पेशवे, कीं ज्यांनीं प्रजेचें पोटच्या

तिपालन केलें, ज्यांचें नांव ऐकिलें असतां मुसलमानांनीं थरथरां कांपावें, व ज्यांच्या वियोगेंकरून सर्व महाराष्ट्रदेश उदासीन होऊन आतां निस्तेज पडला, त्या सत्पुरुषाच्या दरबारीं यांस नेतों; आणि तेथील चमत्कार दाखवितों.

**विदूषक**— सूत्रधारा, अशी स्तुति करण्याची तुझी चालच आहे. पण यांना तूं मराठी दरबार कां दाखवितोस हें मी समजलों. अरे, चोराच्या वाटा चोराला ठाऊक. तुझ्या मनांत मराठी राज्यांत यांस नेलें ह्मणजे दादना फिर्याद, सर्व बुचाडून घेऊन, अलख गोसावी करून परत पाठविण्यास चिंता नाहीं. पाहाहो, बाबांनो! तुमच्या मनांतून धड घरीं निघून जावयाचें असलें, तर आपले चालते व्हा, नाहीं तर पेंढाऱ्यांचे बडगे आले ह्मणून समजाच. कां सूत्रधारा, होय कीं नाहीं, बोल.

**सूत्रधार**— तुझें बोडकें बोल, आतां. कोणत्या नक्षत्रावर जन्मला कोण जाणे, हा राजहंस. शेणाचा दिवा ओंवाळा. कोठें बाप तपश्चर्या करीत बसला होता तें हें रत्न पोटीं आलें, लोकांना या या ह्मणून सांगावें, तो हा शहाणा जाजा ह्मणून सांगतो. हेंच साहित्य करणार कायरे?

**विदूषक**— सूत्रधाराला राग आला. बरें बाबा, जाजा नाहीं याया ह्मणतों. या हो या, आमचा सूत्रधार तुह्माला मराठी दरबारांत नेऊन लुटणार, या हो या. तमचीं पागोटीं द्या हो द्या. आमचा सूत्रधार तुह्माला कांबापू [illegible]णार, या हो या. झालें आतां?

[illegible]वस क[illegible] - झालें ह्मणजे, असा दिवटा साह्यकारी

असल्यावर होणार नाहीं काय ? पण विदूषका, मराठी राज्य केवळ लुटारू होतें असें तूं समजूं नको. तुझ्यासारख्या शहाण्यांची मात्र ही समजूत. माधवरावाच्या राज्यांत कसें होतें तें आतांच दिसून येईल. तूं घटकाभर स्वस्थ जर असशील तर सर्व चमत्कार दृष्टीस पडतील. ( श्रोत्यांस पुनः ) हे श्रोतेहो, आतां तयार व्हा. कंबरा बांधा. वायूपेक्षांही जलद वेग देऊन तुमचीं हीं दृश्य जडें येथेंच जों बसलीं आहेत तोंच तुह्मास सातान्यास नेऊन, तेथून पुण्यास आणून ,दाखवायाचें तें दाखवून, पुनः येथें सोडितों.

( पडदा पडतो ) ( सूत्रधार व विदूषक निघून जातात. )

## प्रवेश २.

सातारा. राजवाड्यांत दिवाणखान्याच्या बाहेरील जागा.

सदोबा भालदार व गणोबा चोपदार.

**सदोबा**— रामराम, गनबा.

**गणोबा**— रामराम, रामराम, सदबा, रामराम. कां सदबा, भोजन बिजन करूनशेनी आला कीं न्हाइव ?

**सदोबा**— त्येकशाला, गनबा, पुसावनू. आज सरकार कचेरी हायना. झोच सरकार सवारीची आज्ञा घेऊनशेनी ग्येलोतो. अन् बगा बायकोन काइ भाकरी काइ कोरड्यास ठ्येवलत त्ये बिगिबिगिशी झटदिनी घेतल अन बगा भोजन बिगिद्यान आटपुन डोइवर मुंडासच ठ्येवल बगा अन् आ...
बगा तुमची गाट पडली बगा.

**गणोबा**— आपुनबी तसच बगा. काय ह्मन त्यात न्हाई परसादिन जिन. आज पुन्यासल मुकत्यार आल्यात ह्मनुनशेनी इतका थाट केलाया. आपल्या बगन्यात येकुन असा थाट न्हवताच बगा.

**सदोबा**— अव त्ये काय राव ह्मनता तुमी ! तालिवार त्ये तालिवार. तुका ह्मन उगी न्हाव अन् ज्येज्ये व्हइल त्येत्ये पाव. आतां गनबा, तुमी कुनिकड चालला.

**गणोबा**— सरकार स्वारिच सुरु होऊन शेनी पोषाक चाललाया ह्मनुन दिवानखान्यांत सर्व्यांस्नी वर्दी द्याया चाललों. तयारी अगदि मर्जी आगदि झालिया. आतां सवारी भाइर येइल. तुमी बी चला चनी. अन् काय.

**सदोबा**— आपुन त तयारच हावोत. हा निगालो बगा, रामराम.

**गणोबा**— रामराम.

( दोघे निघून जातात )

( पडद्या पलीकडे शब्द होतो. )

## प्रवेश २.

रामराज महाराज छतरपती हिंदुपत बादशाहा, ह .ताजीम. नजर रखो, महाराज.

( रामराजा सिंव्हासनावर जाऊन बसतो, नंतर मुजरे होतात. )

भालदार चोपदार पुकारतात } रघुनाथराव, माधवरावपेशवे, पंत प्रधान.

कोंबापूरच छतरपती.

... केशी, अमात्य, सचिव; हिंमत बाहादर,

नामांवरील— अकराव्याचा अंबल होय. घडी भरत आली, महाराज.

( पानसुपारी वांटतात आणि नंतर
कचेरी बरखास्त होते )

## प्रवेश ४

सूत्रधार व विदूषक.

वि० कायरे सूत्रधारा, कशाचीरे कचेरी ही! विडे वांटणारानें मला वेलदोडे बिलदोडे कांहीं दिले नाहींत; अशी कोठें चाल असते?

सू० अरे. मग मागायाचें होतेंस कीं नाहीं ?

वि० अरे तो कोठला खडतर ह्मातारा वांटणारा होता; तो लवंगा देखील देईना.

सू० लवंगातरी तूं मागितल्यास?

वि० मागितल्या ह्मणजे! तुझ्या मनांत राहतों काय? तो कसला खाट ! मला ह्मणाला, थांब, लवंगांबद्दल तुझ्या घशांत मिर्चांची पूड कोंदायास आणतों; नाहीं तर नाहीं, पण हा विदूषक राजाचा मान कायरे! थुः!थुः!थुः!त्या कचेरीच्या तोंडांवर थुः!त्या ह्मातार्‍यां-च्या तोंडावर थुः!.

सू० अहो विदूषकराजे, रागावूं नका, पुण्यास तर तुह्मी चला;तुमची चंगाळी देतों उडवून; तेथें माझी ओ-ळख आहे, पशानें वेलदोडे तुझ्या तोंडांत भरतों; चल तर खरा.

वि० लुच्चा आहेस तूं; त्या ह्मातार्‍यांचा बाप तूं गुलामा कोल्ह्या, वेलदोडे मात्र खाशील तूं आणि आर-पटें तेवढीं माझ्या घशांत कोंदशील.

सू० नाहींरे, त्याची कां तुला काळजी ?

वि० कां काळजी ! माझ्या घशाची मला नको काळजी, तर का तूं बाळगशील ?

सू० पुरेरे बाबा, तुझी, बडबड; सोलून दाणेदाणे तुझ्या घशांत घालीन. उमजलास ?

वि० मग चिंता नाहीं; मग चल तर; आतां कोतवालघोड्यासारिखा नाचत येतों; चल. ( दोघे निघून जातात. )

## अंक २.

### प्रवेश १.

पुणें—शनवारवाड्यांतील कचेरी.

रामाजीपंत व चिंतोपंत ( दोघे कारकून )

रा० कां चिंतोपंत, श्रीमंतांची स्वारी कोणीकडे आहे ? तुह्मी अगदीं जवळ असणारे लोक ह्मणून विचारितों.

चि० जवळ असणारे, अगदीं जवळ असणारे खरे. श्रीमंत कांहीं राजकारणी बेतांत गुंतले आहेत; तेथेंच रघुनाथ राव दादा, सखाराम बापू, त्रिंबकमामा, रामशास्त्री बावा, आणखी कांहींकांहीं जडपार्डीं बसलीं आहेत.

रा० मामा ! त्रिंबकराव मामा ! अहो ते दक्षिणेंत गेले होतेना?. दोनचार दिवसापूर्वीं आले वाटतें. ऐकत होतों तिकडून खंडणी घेऊन येतात ह्मणून; बाळाजीपंत ह्मणत होते. एकुण मामाची स्वारी आली अँ ? ही कांबापू... न कितीवेळ झाला ?

...विस क...— झाला, तासएक होत आला. काय-

सांगूं? श्रीमंतांची कामाविषयीं दक्षता, शाहणपण आणि जलदी हीं कांहीं कोणाला साधायाचीं नाहींत. अल्पवयांत असेगुण असणें फारविरला. पण जाऊंद्या, मला कांहीं कामासाठीं जावयाचें आहे तेव्हां लवकर गेलें पाहिजे. ( निघून जातो )

## प्रवेश २.

माधवराव साहेब पेशवे, रघुनाथराव दादा,
त्रिंबकमामा, रामशास्त्रीबावा, सखारामपंत,
आणखी कोणीकोणी मंडळी.

**रघुनाथराव**— मामा, मांझी मी सल्लादिली. बोला, आतां परचक्रतर अगदीं नजीक येऊन ठेपलें. काय आंगावर तुटून पडावें, कीं आपण आपल्या गोठांतच लपून असावें. कसें करावें ? मलातर बेलाशक आंगावर तुटून पडावें असें वाटतें.

**त्रिंबकमामा**—दादा, मला असें वाटतें. आपण होऊन ऐकून घ्या,— आपण होऊन निजाम अल्लीच्या आंगावर जाण्याच्या खटपटींत पडूंनये. आपल्या गोठांत मात्र तयारी कडेकोठ ठेवावी. तो जवळ आला ह्मणून चिंतानाहीं. आणि त्याहीं पेक्षां— हीं आपलीं लश्करें थकून आलीं आहेत. तूर्त आपला कमी जोर आहे, तेव्हां सोईची गोष्ट करून त्याची समजूत पाडावी हें बरें. आतां मजकडून ह्मणाल तर लढाईला येव्हां याक्षणीं सिद्धता आहे. परंतु उत्तम पक्ष हा दिसतो. यावर श्रीमंत काय ह्मणतात तें समजण्यांत आलें पाहिजे.

**रघुनाथराव**— छेःछेःछे हा अग

ल्हा, यांतकांहीं अर्थ नाहीं. मारजाऊन कधीं पाहिली होती कीं नव्हती अशी खोडकी जिरवावी त्या यवनाची. मामा ह्मणतात अशांत भागुबाईपणा येतो. समरांगण गांठण्यासारखी मौज नाहीं. असें हि करितां जरी पराजय झाला तरीं भागुबाईपेक्षां बरें. कां- रामशास्त्रीबावा ?

**रामशास्त्री—** आपणा उभयतांच्या बोलण्यावरून असें अनुमान होतें कीं वर्तमानकालीं स्वकीय सैन्या- चा गौण पक्ष आहे. अतएव युद्धसंग्राम नकरितां याव्यतिरिक्त अन्योपायाची योजना करून परचक्राचें निवारण करावें हें उचित दिसतें. तस्मात् मामा जें ह्मणतात त्यास माझें अनुमोदन आहे. आतां यावर श्रीमंतांची काय आज्ञा होणें ती होईल.

**माधवराव—** दादा, मामा, शास्त्रीबावा यांणीं अनुक्रमानें आपआपलें ह्मणणें कळविलें. सखारामपंत. आतां तुह्मी आपलें कळवा ह्मणजे झालें.

**सखाराम०—** माझाकांहीं निराळा अर्ज नाहीं. दोन्हीही युक्ति आहेत.

**रामशा०—**सखारामपंत, असें बोलण्याची ही वेळ नव्हे.

**त्रिंबकमामा—** दादांचा विचार माझ्यातर पसंतीस मुदलींच येत नाहीं. कांहीं करणें तरी प्रसंग पाहून करणें हा प्रशस्त मार्ग आहे. राज्यकारभारांत युक्तिप्रयुक्ति सर्व ठिकाणीं जोडल्या पाहिजेत. केवळ धर कीं झोडप, मारीन किंवा मरेन. असें ह्मटल्यानें व्य- कांबापू[illegible] नसते.

[illegible]त्रस क।

**राघोबा**०— नाहींतर कायमामा, घरीं बसल्यानें व्यवस्था होत असते ?

**त्रिंबकमामा**— घरीं बसावें असा विचार मी श्रीमंतांस दिलाच नाहीं. परंतु घरीं बसून कार्य सिद्धि योग्यरीतीनें होत असल्यास त्यांत ह्मणजे भागुबाईपणा येतो असें मला वाटत नाहीं. कांहीं होवो पराजय कां होईना. लढाई करावयाचीच हा अविचाराचा दुराग्रह आहे. दादा आपण असें बोलतां हाच चमत्कार.

**माधवराव**— हें ठीक नाहीं. अहोदादा, अहोमामा. शत्रूच मात्र वाद करण्यास योग्य. त्यांशीं भांडणें सोडून आपण आपल्यांतच कलह मांडला तर कसें ? मामा ह्मणतात तें मलाहीं बरें दिसतें. ज्या अर्थीं आपलें लश्कर थकलें आहे व कमीही आहे त्या अर्थीं निजामअल्लीची समजूत पाडून त्यास परतवावें हें ठीक, त्यांतच कार्यसिद्धि आहे. यवनांच्या गर्वाचें खंडन करण्यास आणखी पुष्कळ प्रसंग येतील. सखाराम पंत, निजाम अल्लीचा काल काय निरोप आला तो पुनः सांगा पाहूं ?

**सखारा**०— त्या यवनाच्या ह्मणण्यांत आपण त्यास बेदर, औरंगाबाद वगैरे त्याजपासून घेतलेले सर्व मुलुख सोडावे.

**माधवराव**— त्याला अशी थैली लिहा कीं बेदर आणि औरंगाबाद मिळून आह्मी तुह्मापासून आज तागाइत साल दरसाल सत्तावीसलाख रुपये घेत होतों त्यास ही थैली पाहातांच तुह्मी येथून ठाणें उठवून जर निघून गेलां तर बेदर आणि औरं-
लचे सदरहु २७,००,००० रुपये आह्मी

परंतु ठाणे जर न उठवाल तर पेशव्यांची शक्ति किती आहे हें दाखवूं. लिहा— सखाराम पंत असी थैली लिहून आतां शिक्कामोर्तब करावयास घेऊनया.

**सखारा०**— जी आज्ञा. लिहून आणतों ( निघोन जातो. पाठीमागून राघोबादादा ही कांहीं काम आहे ह्मणून निघोन जातात. )

**त्रिंबकमामा**— दादांना राग आला आहे असें दिसतें. आपण युक्ति काढली हीच ठीक. दादांचें बोलणें थोडें अविचाराचें होतें.

**रामशास्त्री०**— क्रुद्ध मुद्रा दिसली खरी. परंतु त्यांत अर्थ काय ? झालें हेंच यथायोग्य झालें.

**माधवराव**— ( हंसून ) दादांची प्रकृति थोडी तापट आहे. ह्मटलें असतां झालें यांत त्यांस राग यावा असें कांहींच नाहीं. व असें करण्यांत त्यांचें मन दुखवावें हा आमचा हेतु ही नाहीं. असें ही असतां त्यांना राग आला असें दिसतें. असो वडील आहेत. ( पुनः हंसून ) तीर्थरूप गेले त्यांच्या पाठीमागें हेच आमचा सांभाळ कर्ते. तेव्हां राग जरीं आला तरीं राहायाचा नाहीं. चला आतां. कोणीकडोन एक तर काम उरकलें. दादांची समजूत मग पाडतां येईल. बरें आहे, जा आतां. ( सर्व उठून जातात )

## प्रवेश ३.

राघोबादादा व सखारामबापू.

**राघोबा**— कां सखारामबापू -( रागा दारघेओढून) कांबापू चमत्कार कसाआहे पाहिलातना? आह्मीआज ... दिवस कारभार पाहिला पण आज मूर्खठरलों.

आह्मालाच समजेना. आह्मालाच उमजेना. कायशाहाणे ते तोमामा आणि तोशास्त्री. माधवराव काल नागवा फिरत होता. अझून तोंडाचाजार नाहीं वाळला. ओंठपिळलातर दूध निघेल. आणि आज मला सवाहात लांब गोष्टी सांगूं लागला. “ मामाह्मणतात तें बरें दिसतें, त्यांतच कार्यसिद्धि आहे ” असा मला बुद्धिवाद करितो. मी येवढा झालों, माझ्यापेक्षां हापोर शाहाणाकायहो ? कायबापू एकएक चमत्कार सांगूं ? आतांच्या काळचीं पोरेंच अशीं. नाहीं तर मी सांगेन तें याणें निमुटपणें ऐकावें. बरें आतां पाहातों. कसें माझ्याशिवाय राज्यचालतें तें पाहातोंना आतां. तेथें तोंडानें गोष्टीनाहीं सांगायाच्या. उद्यां उजेडूंतरद्या; साफआह्मी काम पाहात नाहीं असेंमी ह्मणणार. हासगळा पोरवडा होणार. यांतकांहीं अर्थ नाहीं. तुह्माला सांगतों मी सोडिलें कीं लागलीच तुह्मी कामसोडा. आणखी जितके आपल्या पक्षाचे आहेत तितक्यांना अशीच ताकीद द्या. असें केल्यावर माधवराव जर दुसरे दिवशीं न पांयांपडेल तर माझें नाव निराळें. कां कसें ? तुमच्या मनास येत नाहीं असें दिसतें.

**सखाराम** ०—माझ्याकडून ना नाहीं. आपण जो बेत कराल त्यांत मी आहें. जोंपर्यंत याशरिरांत अस्ति आणि चर्म आहे तोंपर्यंत मी आपल्या शिवाय कोठेंहीं व कधींहीं राहणार नाहीं. आपण जी आज्ञा कराल ती करण्यास मी सदा तयारच आहें, याविषयीं आपल्या मनांत तिळमात्र संशय येऊं नये.

**राघोबा**०— हींच तर तुमची आमची

क. उद्यां सूर्य जों क्षितिजावर आला नाहीं तोंच माधवरावाच्या कारभारांत घोंटाळा करून सोडितों. आपण कामांतून निघालों ह्मणजे अर्थात झालेंच हें. यांत कांहीं संशय नाहीं. हें तुह्मी समजून ठेवा. चला आतां आपण जाऊं. उद्यां असें करायाचें बरें? आज सर्वांना अगदीं ताकीद करून ठेवा.

( दोघे निघून जातात. )

## प्रवेश ४.

रघुनाथरावाचा दिवाणखाना.
रघुनाथराव व आनंदीबाई.

**रघुनाथ०**— ( मनाशींच ) कायमेटा चमत्कार! हंः!शाबास—अरे मी रघुनाथराव आणि मला असें हंः! काळच तसा आला आहे. हं.

**आनंदीबाई**— कां आज लवकर येणें झालें. जायाचें तेव्हां ह्मणायाचें कीं "आज बावा मला उशीर होईल. कांहीं फार निकडीचें काम आहे" आणि यायाचें तर लवकर. तेव्हां लोकांनीं त्या बोलण्याचा काय नेम धरावा?

**रघुनाथ**— अगे आतां काय, लवकर काय आणि उशिरांकाय. सगळाच चमत्कार आहे. आजचें तुला वर्तमान काय ठाऊक आहे?

**आनंदीबाई**— तें काय बाई. येथून गडबडीनें जायाचें उशिरानें येईन ह्मणोन, तेवढेंमात्र मला ठाऊक. काय झालें काय?

**[illegible]नाथराव**— अगे, आह्मी ह्मणजे त्या माधवरा[illegible]ा झाडाचा पाला असें वाटतें. उद्यां साफ

आह्मी काम पाहात नाहीं ह्मणून सांगणार. मग पाहातांना कसा राज्यकारभार चालतो तो. तसेंच सखारामपंत, तसेंच सर्व मंडळी करणार. तूं पाहा तर खरी त्याची कशी व्यें करून टाकतों.

**आनंदीबाई**— असें झालें तरी काय? माधव कांहीं बोललाकीं काय?

**रघुनाथ०** — अगे बोलायाचें तेंकाय. आह्मी सांगितलेलें ऐकतनाहीं आणि तोमामा सांगेल, तो शास्त्री सांगेल तेंखरें — तो बाळकृष्णबावांच्या जाग्यावर ठेविला आहेना, तोशास्त्री. पोरखेळ मांडला आहे आणि काय?

**आनंदीबाई**— आतां समजलें. हासगळा त्या रमाचाखेळ आहे. ती दिसायाला मोठी भावडी दिसती, पण अगेबाई मोठी खबरदार बायको आहे हो; तिचा हा खेळ.

**रघुनाथ०**— तें काय ? रमाचा खेळ कसा ? असेल बावा कोणी सांगावें ? या आतांच्या पोरी काय नवऱ्यांना सांगतील आणि काय नाहीं याचा नेम नाहीं. काय रमाचा खेळ ! कसा कसा सांगसांग बरें.

**आनंदीबाई**— मामा जेव्हां आले तेव्हां अगोदर माधवरावाकडे गेले. आणि मग रमाच्या महालांत गेले. तेथें ( रघुनाथरावाकडें बोट दाखवून ) विषयीं कांहीं कांहीं बोलले.“ सगळें हातींच असायाचें. स्वभाव कांहीं चांगला नाहीं. माधवरावाचें कांहीं चालूंद्यायाचें नाहीं असा बेत असायाचा”— येक कांदोन—अशीच भाकड कथा सांगत होते, ती रखमाई रमाची लुगडें नेशीवणारी ती मला सांगत होती. तेंच र

कांनीं सांगितलेलें ऐकून घेऊन नवऱ्याजवळ बोलली असें वाटतें. नवरा काय मेला दळ्या बाईलबुद्ध्या ह्मणून असें झालें.

**रघुनाथ०**— असें काय ? हें आतलें कोणाला ठाऊक ? हीं बायकांचीं सांगणीं आणि नवऱ्यांचीं ऐकणीं आपल्याला नव्हतीं कधीं ठाऊक. गादीवर बसलें ह्मणजे झालें असें नाहीं कांहीं. बरें आतां पाहतों. कसा कारभार चालतो तें पाहातों. दुसरे दिवशीं जर पायां न पडला माझ्या, आणि दादा कारभार पाहा न ह्मणाला, तर तुला उजवी मिशी देईन उतरून.

**आनंदीबाई**— हो, येईलतर काय झालें. पण मगएक कितीकां पायापडेना. मी नाहींच येत. हेंच उत्तर. मग अर्धेंराज्य घ्यावें तेव्हां काम पाहावें. असें केलें ह्मणजे त्याची खोडकी जिरेल आणि त्या मेल्यांचे डोळे उघडतील.

**रघुनाथ०** — आतां तोच बेत धरला आहे अर्धें राज्य घेईन तेव्हां काम पाहीन. हाच निश्चय.

## अंक २. प्रवेश १.

माधवरावाचा दिवाणखाना.

माधवराव साहेब, त्रिंबक मामा, गोपाळराव पटवर्धन, आपा बळवंत, मल्हारराव रास्ते, नानाफडनवीस, रामशास्त्री बावा.

**त्रिंबकमामा**– आज इतक्या प्रातःकालीं लगबगीनें बोलावूं कां पाठविलें ? जासूद आला आणि आतांच ... आहे ह्मणाला, ह्मणून जपजाप तसाच

राहिला; फक्त संध्या झाली होती आणि तसाच आलों.

**माधवराव—** ठीक केलें. तसेंच कांहीं निकडी-चें काम आहे ह्मणून बोलाविलें. जपजाप काय मग होईल. काल निजाम अल्लीविषयीं निर्णय ठरवून मी आपल्या ह्मणण्याप्रमाणें हुकूम दिला. त्यावरूनवा-टतें दादांस राग आला. आज आपला आयने महालांतू-न बाहेर आलों तों दादा, सखारामपंत, व आणखीं कित्येक बाहेर उभे होते. तेव्हां काय ह्मणून विचारितांच लागलींच राजीनामें दाहापांच असामींचे स्वाधीनकेले. मग दादांस मी ह्मणालों " असें करण्याचें कारणकाय?" तेव्हां त्याणीं उत्तर केलें कीं कारण ह्मणून कांहींनाहीं. उगीच कारभाराची कटकट कशाला पाहिजे ह्मणून आह्मी सोडितों. मगमीतरी कशाला आग्रह धरूं. तेथून निघालों तों येथें आलों.

**त्रिंबकमामा—** हा काय विलक्षण राग. त्यांच्याम नांत आह्मीजरी वास्तविक सांगायाचें तें सांगितलें तरीं आपण आमचें न ऐकतां आपलें ऐकावें.

**गोपाळराव—** सरकारी कामांत अशा गोष्टींचा राग काय उपयोगी? दादांनीं येवढी तेवढी गोष्ट मनांत धरावी हें ठीक नाहीं.

**माधवराव—** तें सगळें खरें. पण येऊन बेतली पुढें उपायकाय बोला? मी, शास्त्रीबावा, आपल्याकडून सांग-तों, मी ह्मणून दादांनां तुह्मीयाच असें ह्या तोंडानें ह्मणणा-र नाहीं. त्यांना वाटलें असेल माधवराव काय पोर आहे, आपल्या शिवाय त्याच्या हातून काय होणार? ते व्हां आपल्याला येवढें तर पाहिलें पाहिजे कीं त्यांच्या शिवाय चालतें कीं नाहीं. चालतें तर बरें आ

उमजतील, नचाललें, तर त्यांचा वडील मानच आहे; आपणास त्यांच्या पायांपडायास काय हरकत आहे? कां शास्त्रीबावा, आपण न्यायाधीश आह्मां, येवढा न्याय उलगडा आतां.

**रामशा०**— दादांनीं फार अनुचित कर्म केलें; आतां मला हा राजमार्ग दिसतो कीं आपण कोणी योग्य-यथाशास्त्र, यथान्याय वागणारा, चतुर, लोकप्रिय गृहस्थ पाहून त्यास कारभाराचें प्रमुखत्व देऊन आपण स्वतः राजधर्म पाहवा आणि राजक्रिया चालवाव्या. आपल्यासारख्यांनीं कोणावर अवलंबून असूंनये.

**माधवराव**— सर्व गोष्टींत शास्त्रीबावा आह्मांस गुरूचे ठिकाणीं आहेत, तेव्हां त्यांचाउपदेश ऐकणें भाग आहे. बरें तर आतां कारभार कोणाला द्यावा?

**गोपाळराव** — त्याविषयीं श्रीमंतांनीं काळजी करूंनये. त्रिंबकमामा सारिखे कारभारी केल्यावर काम पहिल्यापेक्षां चागलें चालेल. त्यांस आज्ञा मात्र व्हावी.

**माधवराव**— माझाही विचार असाच आहे. मामांनीं कारभार पाहवा. तसेंच तुह्मी, आपा, मल्हारराव, नाना, यांनीं आपआपलीं कामें पाहवीं, न्यायखात्यांत तर (रामशास्त्र्याकडे बोट दाखवून) प्रत्यक्ष हे तेजोरूपी न्यायमूर्तीच उभी आहे. मामा, तुह्मी आजपासून काम पाहण्यास आरंभ करा.

**त्रिंबकमामा**— आह्मास काय जसें सांगणें होईल तसें करायाचें; हे इतके आपले सेवक कामांत असतां दादा रुसून गेले ह्मणून चिंतानाहीं. निजाम अल्ली तर थैली मान्य करून परत निघून गेला. आपण-कारभाराविषयीं कांहीं काळजी करूंनये.

**माधवराव**— झालें तर, येवढ्याकरितां आज आपणा सर्वांनां बोलाविलें होतें. असे सुंदर कारभारी मिळाले आतां मी निसूर झालों. परवां रामशास्त्री बावाच ह्मणाले कीं, शरीरास जसे अवयव अथवा इमारतीस जसे खांब तसे राज्यास कारभारी आहेत. जर खांब बळकट असतील तर इमारत ही मजबूत राहील. जर अवयव सुदृढ असतील तर शरीर ही निरोगी राहील.

**रामशास्त्री**— मला थोडी आज्ञा असावी. आह्मी सर्व शरीराचे अवयव खरे परंतु या अवयवांकडून चलनवलन करविणारा शरीरांत आत्मा ह्मणून एक असतो, ही उपमा आपल्याकडे येती. असो आतां आपल्या उपहारास उशीर होईल. ही पुनः मुत्पाकांतून वर्दी आली. चला मामा आतां सर्व व्यवस्था तुह्मास ठेवणें भाग आहे. द्या आज्ञा.

**सर्व**— आज्ञा व्हावी तर; हुकूम झाल्याप्रमाणें तजवीज करण्यास जातों.

**माधवराव**— ठीक आहे. मी हा चाललों. राज्य सुरक्षित चालून लोक सुखी राहोत ह्मणजे झालें. (सर्व निघून जातात.)

## प्रवेश २.

रमाबाईचा आयनेमाहाल.

माधवराव, व रमाबाई.

**रमाबाई**— ( पलंगावर निजली होती ती, लगबगीनें उठून ) अगे बाई यावयाचें हें मला ठाऊकही नाहीं. मघा आपा फार घाईनें निघाले आणि ह्मणाले कीं आज फार जरूरीचें काम आहे. ते—

लागले ह्मणून मी आपली निजल्यें होत्यें. झालें कां? असें काय काम होतें.

**माधवराव**— होतें. तुह्माला काय सांगायाचें आहे. बायकांच्या तोंडांत गोष्ट राहत नसते.

**रमाबाई**— पुरे पुरे. कधीं बाहेर कांहीं बोललेलें ऐकिलें आहे कां उगच मेला जातां येतां टोला द्यावा. येथें कोठें राहतें आहे, आतां माझेपाशीं फुटेल पाहा. नाहीं खरेंच. थट्टेनें नाहीं ह्मणत. खरेंच काय झालें?

**माधवराव**— एकदा सांगितलें तर खरें. सरकारी कामांत बायकांना काय करायाचें आहे? आमचें राज्य आणि आह्मी हवें तें करूं. तुह्माला काय त्याचें?

**रमाबाई**— वः, बोलूं नाहीं देणार. मी अर्धांगी आहें ह्मटलें, निम्मी सत्ता माझी आहे. मग नकोका मला पाहयाला. नाहीं खरेंच थट्टा नाहीं.

**माधवराव**— पाहिलें पाहिजे तर.

**रमाबाई**— मग नाहीं कां सांगत; नाहीं तर नाहीं जा. मी जों जों ह्मणावें तों तों अधिकच.

**माधवराव**— बरें तर सांगतों; तुह्मी आज निजलांच होतां. मी उठून बाहेर गेलों तों आपले दादा उभे. मी त्यांना कां ह्मणून विचारिलें मात्र, इतक्यांत आह्मीं काम पाहत नाहीं ह्मणाले आणि चालते झाले. तेव्हां अर्थातच दुसरे कारभारी नेमून व्यवस्था ठेवणें भाग आलें; त्रिंबकमामांस कारभार पाहयास सांगितलें. तसेंच गोपाळराव, शामराव, आपा, नाना, यांना कामें सांगितलीं. शास्त्रीबावा ते तर आहेतच.

**रमाबाई**— तरीच. मामंजीशीं बोलणें झालें तें येथें ऐकिलेंच, परंतु हें पुढलें ठाऊक नव्हतें.

काय चमत्कार. आज आनंदी सासूबाई सकाळपासून आल्या नाहींत कीं बोलल्या नाहींत. मघाशीं मी कुंकू लावीत बसलें होतें आणि त्या अशा गेल्या. पण जशी कांहीं ओळख आहे कीं नाहीं. मी कोण आणि त्या कोण. काय मेलें, आपणाला मात्र लोक नांवें ठेवतील, असें वाटतें. परवां मला भरजरीपैठणी आणली. त्यांना वाईट वाटेल ह्मणून — सांगून दुसरी जेव्हां आणवून दिली तेव्हां मग मी नेसलें. तसेंच अहिल्याबाईकडून महेश्वराहून भेटीची वेणींत गुंफायाला मोत्यें आलीं होतीं त्यांतलीं थोडीं त्यांच्या स्वाधीन केलीं तेव्हां मी घालूं लागलें. कसेंही करा संतोष नाहीं. असो, वडील आहेत ह्मणून शोभलें जातें. आह्मी केलें असतें ह्मणजे मग — कायग बाई पोरी या सगळ्या गांवभर डंका केला असता.

**माधवराव**— वडीलच आहेत. रागकेला तसाच लोभही करितील. परंतु दादांनीं असें करावयाचें नव्हतें. ( डोळ्यांत अश्रु आणून ) इतक्यांत त्यांणीं आमच्या तीर्थरूपांचे शेवटचे शब्द विसरावयाचे नव्हते. ( उसासा टाकून ) त्यांचे ते शब्द माझ्या पुरे ध्यानांत आहेत. माझाहात धरून दादांच्या हातांत दिला आणि ह्मणाले; माधवा मी तर चाललों. आणखी एकदोन दिवसांत हें जग मला नाहींसें होईल. आतां एकाघटकेंत या संपत्तीचा, या ऐश्वर्याचा, या राज्याचा माझ्याशीं संबंध तुटेल. राज्य करीत असतां या पुण्याच्या लोकांस सुखद्यावें ह्मणून मी पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्या चांडाळ यवनाच्या चुरशीनें तें ... व्यर्थ गेलें. आतां माझ्या पाठीमागें तूं पेश...

तेंव्हां लोकांस सुखीकरण्याचे प्रयत्नकर. दादांचें ऐकतजा. तुझें पोरवय आहे. दादा प्रौढ आहेत. आजपर्यंत शिकवणुकीची गोष्ट मी तुला सांगत आलों. आतांमाझ्या ठिकाणींच दादांना समज — आणि दादांस ह्मणाले दादा माधवरास संभाळा. तुमच्या ओठ्यांत त्यासघ्या, त्याचें उणें पडूं देऊं नका. तें आतां परदेशीं मूलझालें आहे. जातीनें तो गरीब आहे. दादा त्याला विसरूं नका. त्याला राज्यरीति शिकवा. त्याच्याकडून यवनास दंड करवा तुह्मी त्याचे तीर्थरूप व्हा. माझा नव्हे, आतां तो तुमचा मुलगा आहे. फिरवा माझ्या डोळ्या समोर तुह्मी त्याच्या तोंडावरून हात फिरवा. तुह्मी परस्परांवर प्रीतिकरितां हें पाहून मला मरूंद्या. अरेरे काय दारुण प्रसंगतो.— नकोबाळे नकोडोळ्यांतून पाणीकाढूं भगवत् सत्तेपुढें ब्रह्मदेवाचाही उपाय नाहीं. मग आपणतर माणसें आहोंत. उगी ( धोतरानें तिचेडोळे पुसतो )

**रमाबाई**— इतकें झालें असतां मामंजीनीं असें केलें. ह्मटलें ह्मणजे कोणावांचून कोणाचें अडतनाहीं, पण त्यानीं असें करायाचें नव्हतें.

**माधवराव**— हो, अडतें कोणाचें, आई मेली तरी दाहा दिवसाच्या मुलाचें नाहीं अडत, मग हें तर काय; पण इतकेंच कीं दिसण्यांत हें विरुद्ध दिसतें, त्यांणीं आह्मी एकविचारें असावें. एकचित्तानें राज्यकरावें यांत उभयतांस भूषण. परंतु नाहीं, तें यशघेणें आमच्यानशिवीं दिसत नाहीं. आतां आपण तीर्थरूपांचे शब्द खरे करावे. माझी अशी फारइच्छा

आहे, कीं या पुण्यांत जिकडेतिकडे हास्यवदनें दृष्टीस पडावीं. कोणी परकी गृहस्थ आला असतां त्यास सर्व सुखी दिसावे; परंतु अधिक सुखीकोण? हा कीं हा हें ओळखितां येऊंनये.

**रमाबाई**— होगड्ये. मला देखील असेंच वाटतें. पलीकडे मारुती जवळून बायका पाण्याला जातअसल्या ह्मणजे मला असें वाटतें कीं त्या सगळ्यांना माझ्यासारिखीं लुगडीं नेसवावीं, माझ्यासारिखे त्यांना दागिने घालावे, माझ्यावर जशीप्रीति आहे तशी त्यांच्यानवऱ्यांनीं त्यांच्यावर करावी. खरेंगड्ये काय असेल हें सदा असें वाटतें.

**माधवराव**— शाबास. राज्यास स्वामीण पाहिजे ती अशीच. नाहींतर आमच्या आनंदी- काकु. आहाहा! काय सांगूं पण! दादा जातीनें भाबडे आहेत. त्या पुरुषाच्या आंगीं वैर मुळचें ह्मणून नाहीं. परंतु करतोकाय! सांपडला बाईच्या तडाक्यांत, गेलीबुद्धि फिरून. मी मोठा दैववान् कीं अशी सद्गुणी मुलगी माझ्यावांट्यास आली. असो आतां जातों.

( निघूनजातो )

## प्रवेश ३.

देव घराच्या पुढील सोपा.

**रामशास्त्री**— अरे पांडोबा, श्रीमंतांची स्वारी कोठें आहे.

**पांडोबा**— स्नान करून देव घरांत बसले आहेत, जपास आरंभ झाला आहे. गांठ घ्यावयाची आहे?

**रामशास्त्री**— होय जा जाऊन विनंती कर.

**पांडोबा**— आज्ञा केली असती, परंतु

ध्यान्ह झाल्या शिवाय कोणीही आले तरी गडबड करण्यास येऊं नका अशी ताकीद झाली आहे.

**रामशास्त्री**— अशी ताकीद झाली आहे! मध्यान्ह कालपर्यंत ! कायरे विठोबा कसें ?

**विठोबा**— जी साहेब. पांडोबा ह्मणतो असेंच, ती वेळ होईतोंपर्यंत आजकोणाचा आंत रिगाव दिसत नाहीं.

**रामशास्त्री**— हंहं, तर मग मी आतांजातों ब्रह्मकर्म आटपून बाहेर आले ह्मणजे, मी आलों होतों अशी सूचना करा. विसरूंनका ( निघून जातात )

## प्रवेश ४.

रामशास्त्र्याचा वाडा.

रामशास्त्री आणि त्यांची पत्नी.

**पत्नी**— आज दिसण्यांत चित्त उदास दिसतें; काय कारण तें मला सांगितलें पाहिजे.

**रामशास्त्री**— उदास खरेंच; वाड्यांत गेलों होतों. तेथें श्रीमंत जप करीत बसले आहेत व दोनप्रहरपावेतों गांठ पडणार नाहीं; असें समजलें.

**पत्नी**— मग त्यांत वाईट तें काय ? स्नानसंध्या कां वाईट ! ( हंसत्ये )

**रामशास्त्री**— वाईट ह्मणजे कांहीं संशय कीं काय ? दोनदोन प्रहर स्नानसंध्येंत घालविल्या वर प्रजेचें रक्षण कसें होतें. इतरांची गोष्ट निराळी आणि श्रीमंतांची गोष्ट निराळी आहे. त्यांचें मन फिरविण्यास आतां कांहीं युक्ति योजिली पाहिजे. स्वयंपाक सिद्ध असेल तर भोजन करून पुनःजातों.

[illegible] जाऊन पाहत्यें.

( आंत जाऊन आल्यावर )

बाई तर स्वयंपाक आटपून केव्हांचीं हातजोडून बसली आहे. इकडूनच उशीर.

**रामशास्त्री—** शाबास, मी मघांपासून वाट पाहतों आहें. शेवटीं ठपका आह्मावरच. ठीकठीक, हा उटलों ( निघून जातात )

## प्रवेश ५.

### शनवार वाडा.

### माधवराव व रामशास्त्री.

**माधवराव—** या शास्त्रीबावा ठीक आगमन झालें; आपली स्वारी प्रातःकाळीं आली होती परंतु जप करीत बसलों होतों त्यामुळें गांठ पडली नाहीं. ब्राह्मण कुलांत जन्म घेतला आहे त्याअर्थी त्याप्रमाणें कांहीं केलें पाहिजे. जन्मास आल्याचें कांहीं तरी सार्थक नको ?

**शास्त्रीबावा—** तसेंच आह्मास ही सार्थक केलें पाहिजे योगसाधनाचे मार्ग फार उत्तम आहेत सर्व त्रिभुवन व्यापक आनंदरूपी, असाही असतां अहंकार मोहादिशत्रू करून बद्ध झाला जो परमात्मा त्याच्या मुक्तीची इच्छा आपल्याठायीं झाली आहे. येणें करून जीवात्म्याचें कल्याण होईल. मीही त्याच क्रमाचें अवलंबन करणार; परंतु तसें करण्यास हीं ऐहिक सुखें उपयोगीं नाहींत. सर्व संगाचा परित्याग करून सुक्षेत्रीं सावधान चित्तानें अधिष्ठित झालें पाहिजे. अतएव काशीक्षेत्रीं जावयाची योजना करून आपली आज्ञा घ्यावयास आलों आहें. आपली

इच्छा आहे ह्मणून दुसरी विनंती करितों कीं आपण ही प्रस्थान ठेऊन मज बरोबर येण्याचें करावें. काशी ह्मणजे केवळ प्रतिकैलास आहे. तेथें जान्हवीच्या पवित्र उदकाचें त्रिकाल स्नान करून जपजाप्य योगमार्ग व भगवंताच्या मंगल नामाचें स्तवन हेंच करण्यांत कालक्षेप करूं.

**माधवराव—** आपला भाव माझ्या लक्षांत पुरा आला नाहीं. परंतु साधारण असें वाटतें कीं जपजाप्य करीत बसलों होतों त्यावर आपला रोंख आहे.

**शास्त्री॰—** माझ्या बोलण्यांतील भाव इतकाच कीं, आत्मस्वरूप ओळखण्याची आपणास इच्छा झाली आहे. ही फार चांगली. याजकरितां आपण मजबरोबर काशीस चलावें. मी आपणाकडून योगमार्गाचें अध्ययन करवीन.

**माधवराव—** आतांतर उमजलोंच. मी पूर्वीं बोललों तेंच. शास्त्रीबावा, आपण योग्य पुरुष आहां. आपली निस्पृहता पाहून माझें पूर्ण समाधान झालें. आतां आपलें वास्तविक ह्मणणें कळवा.

**रामशास्त्री—** श्रीमंतांचा=

**माधराव—** मघांची थट्टानको. खरें तें सांगा, मी उपदेशास पात्र आहें.

**रामशास्त्री—** ( हंसून ) श्रीमंतांची थट्टा करण्याची योग्यता माझी नाहीं. आपण जप करीत मध्यान्ह काल होईतोंपर्यंत जर बसलां तर प्रजेचें संरक्षण कसें होईल ? मुख्यांनीं कारभार पाहणें सोडिलें ह्मणजे हाताखालील कामगार-अर्थातच आळशी होता- ...असें झालें ह्मणजे गरीब गुरीबांची दाद कशानें

लागते ? आपण जप करीत दोनप्रहर पावेतों बसणार असें जेव्हां ऐकिलें तेव्हां तो जप सर्व अनिष्टांचें मूळसा मला भासला. आतां आपला मुख्य धर्म प्रजाप्रतिपालन हाच होय. तें जर सशास्त्र झालें तर त्यांतच आपणास मुक्ति आहे. आपण त्यांचें संकटापासून रक्षण करावें आणि त्यांणीं आपणासाठीं परमेश्वरापाशीं वर मागावे. असा परस्पर संबंध ज्याराज्यांत राहातो, त्या राज्यास वैकुंठाचीच उपमा योग्य. यास अनेक शास्त्राधार आहेत. केवळ माझेंच ह्मणणें असा अर्थ नाहीं.

**माधव०**— मला शास्त्राधार आपणापुढें नकोत आपणच जागृत शास्त्रावतार आहां. शास्त्रीबावा आज मला आपण मोठ्या संकटांतून बाहेर काढिलें. नाहींतर लोकांना थोड्याच दिवसांत माझा कंटाळा आला असता. कारभारी निस्पृही पाहिजेत ते येवढ्याकरितां.

**रामशा ०** — माझ्या बोलण्याचा श्रीमंतांस क्रोध आला नाहीं यावरूनच लोक आपल्या स्वभावाची तारीफ करितील. आतां मला आज्ञा असावी.

**माधव ०** — उत्तम. मला आणखी कांहींगोष्टी विचारावयाच्या आहेत. परंतु आतां अवकाश दिसत नाहीं. दुसरी एकादी संधी लवकरच येवो.

**रामशा०** — मी आपला सेवक आहें. दर्शनास दर रोज येतच असतों.

( रामशास्त्री निघूनजातात. )

**माधवराव**— भला निस्पृही ब्राह्मण. शाबास.

शास्त्रीबावास न्यायाधीश केल्यापासून मुलखांत आबादीझाली यांत नवल नाहीं. असलापुरुष विरळा. माझे सर्व स्तुत्य उद्देश आतां त्यांस कळवून त्यांचें अनुमोदन विचारितों. कोण आहेरे बाहेर — बहिरू— जयाजी—

**जयाजी**— जी सरकार, आज्ञा, हजर हाय.

**माधवराव**— जयाजी रामशास्त्र्याकडे जा, आणि ह्मण कीं, रात्रीं मी बोलाविलें आहे.

**जयाजी**— आज्ञा सरकार ( निघून जातो )

( रात्रझाल्यानंतर )

## प्रवेश ६.

दिवाणखाना.

**रामशास्त्री**— ( दरवाज्यांत ) कायरे ? कृष्णागायकोंड, श्रीमंतांची स्वारी आंत आहे कीं नाहीं ? शोधकरून येबरें, मी आलों आहे ह्मणून विनंती कर.

**कृष्णाजी**— जी, हुकुम. आब्या, आब्या, उठ उठ घे काठी.

( आबा जाऊन आल्यानंतर )

जी सरकार हुजूर स्वारीतर वाढोळची येऊन बसलीया. अर्ज केला. आमंदी हाटकलय.

( रामशास्त्री आंतजातात )

**माधवराव**— ( ताजीमदेऊन ) नमोनमः यावें शास्त्री बावा. आपला येतों ह्मणून निरोप आल्यावर येथें येऊन बसलों.

**रामशास्त्री**— सेवकांस मान देण्याचा हा एकमार्ग आहे. नाहींतर आमचा निरोप गेल्याबरोबर [illegible]ण यावें ही आमची कोठली योग्यता ? त्याधनें

चाकरास अहो ह्मटलें, ह्मणजे सर्व अहो ह्मणतात.

**माधवराव—** बसा शास्त्रीबावा हा लोड.

**रामशास्त्री—** आज्ञा.

**माधवराव—** बोलावूं पाठवण्याचें कारण असें कीं, लोकांस सुखावह होतील अशा कांहीं गोष्टी करण्याचा आपण आपल्याकडून पाया घालावा, असें वारंवार मनांत येतें याविषयीं आपली सल्ला विचारावी. असा आजमाझा कितीक दिवसांचा विचार आहे. परंतु वानर ह्मणतें पाहाट झाली ह्मणजे घरबांधूं तशीगत झाली. एवढ्या करितां जासूद पाठविला. आपलें मत कसें आहे ?

**रामशास्त्री—** प्रजापालकांचा हा धर्मच आहे, कीं त्यांणीं सदैव लोक कल्याणार्थ युक्तिप्रयुक्ति जडवाव्या. आह्मा कडून राजधर्माचें अध्ययन करवीत असतां आमचे आचार्य वारंवार ह्मणत कीं प्रजेस सौख्यव्हावें, एतद्विषयीं जो दक्ष तो राजलक्ष्मीपासून आपण किंचितही शोभा न पावतां उलटी तीस शोभा आणतो. भगवंतानें आपणास लोकांच्या दुःखाचा परिहार करण्याची इच्छा दिली, हें पाहून मला वास्तविक आनंद होतो. भूतदया, हा सर्वांसच श्रेष्ठ धर्म आहे. सत्पुरुषांचें असेंच लक्षण.

॥ निर्गुणेष्वपिसत्वेषुदयांकुर्वंतिसाधवः ॥

॥ नहिसंहरतेज्योत्स्नांचंद्रश्चांडालवेश्मनि ॥

तेंच पृथ्वी पतींनीं आपण केलें पाहिजे. मलाही कांहीं सूचना करावयाच्या होत्या ती आयतीच संधी आली. लोकोपयोगीं गोष्टींत दोन तऱ्हा पाळिल्या पाहिजेत. ( १ ) सांप्रत जी अव्यवस्था असेल ती

उपटून टाकिली पाहिजे ( २ ) व दुसऱ्या नव्या उपयुक्त गोष्टी उत्पन्न केल्या पाहिजेत.

**माधवराव**— आपण एकदोन सांगा माझ्यापेक्षां आपणास अनुभव फार आहे.

**रामशास्त्री** — आश्रितांशीं इतक्या नम्रतेनें वागणारे भूपती थोडेच असतील. या न्यायाच्या कामांत धर्मशास्त्रा अन्वयें न्यायतर चालतच आहे, परंतु कित्येक असे खटले उभे राहतात कीं त्यांचा निर्णय व्हावा, एतदर्थ अवांतर ही अनेक विचार पाहणें भाग येतें. याकरितां कांहीं पंचायती ठरवाव्या आणि ते ठराव प्रत्येक ठाणेदारांकडे पाठवावे. त्यांणीं त्यांच्या अनुलक्षेंकरून न्याय निवाडे करावे. या कृत्यास आरंभ करण्यास आज्ञा होईल, तर मी करीन. मात्र, आपण माझें साहित्य करण्यास नारायणशास्त्री पटवर्धन, कृष्णशास्त्री परांजपे, जनार्दनशास्त्री अठले, माहादेवशास्त्री आगाशे, आणि त्रिंबकशास्त्री आपटे, यांस द्यावें.

**माधवराव**— उत्तम आहे. असें केल्यापासून प्रजेचें चांगलें संरक्षण होईल खरें. शिवाय आपण ह्मणतां अशी मंडळी नेमल्यावर काम तडीस जाईलच जाईल.

**रामशास्त्री** — यामंडळींत आपण मुख्य स्थानीं येऊन बसलें पाहिजे.

**माधवराव**— अतिउत्तम. अग्निहोत्र्याचा होम टळेल, परंतु माझा हा नेम टळणार नाहीं.

**रामशास्त्री**— दुसरी अशी सूचना आहे कीं, [illegible]पतची लढाई झाल्या दिवसापासून तेथें पराभव

झाला ह्मणून आपल्या राज्यांत राहणाऱ्या मुसलमानांस कित्येक कामगार त्रास देतात. याविषयीं बंदोबस्त झाला पाहिजे. त्यांचे बंधुजन इराणी, दुराणी, अफगाणी यांणीं जरी उन्मत्त होऊन सदाशिव रावांचा पराजय केला, तरी आपल्या राज्यांत जे राहत होते त्यांणीं आपणाविरुद्ध बोट देखील उचललें नाहीं. त्यांणीं या सुख समुद्रांतील लाटांचा, या राज्यरीतीचा पुरा अनुभव घेतला होता. त्यापासून झालेले फायदे पुरे समजून ते राजप्रीतींत किमपि कमी नव्हते. शांत समुद्रांत चळकट नांगरलेलें गलबत तरी कांहीं हालतें परंतु त्यांचीं मनें अगदीं अस्थिर झालीं नाहींत. आपल्या सैन्यांतून सुद्धा ते लढत होते. असें असतां त्यांचा छळ कोणत्या कारणानें करावा ?

**माधवराव**— पानपत ! पानपत ! ( उसासा टाकून ) मराठ्यांचा पराजय ! असो, परंतु शास्त्रीबावा ही गोष्ट माझ्या कानीं आली नव्हती. हिंदु काय, मुसलमान काय, अठरा पगड जातीचे लोक जे कोणी आमच्या आज्ञा नीट मानून स्वस्थ आहेत त्यांस मी आपल्या पोटच्या लेंकरांसारिखे मानितों. त्यांना कोणी ही इजा दिली तत्रापि माझ्या मानाचें खंडण होतें, यास्तव आज्ञापत्रें लिहून शिक्का मोर्तब करावयास आणा. त्यांत असें लिहा ( रामशास्त्री टिपतात ) “ आज्ञाकरण्यांत येतें ऐसाजे आमच्याकांनीं अशी फिर्याद आली आहे कीं न्याय पंचायती करण्यास ज्यांना आह्मी मुखत्यारकेले त्यांतून कित्येक, यवन वगैरे नीच जातीच्या लोकांस आमच्या हुकुमाविरुद्ध उगीच त्रासदेतात. ऐशीयास आजतागाइत पासून आमच्या राज्य

कोणत्याही भागांतून, कोणत्याही वर्णाकडून कोणत्याही कामगारा विरुद्ध कांहीं तक्षिरीची वाजवी फिर्याद आल्यास त्या कामगारास त्याच्या गैरवर्तणुकी बर हुकुम सजा दिली जाईल. माहार, मांग, चांभार, धेड, मुसलमान हे जरी जातींनें हलके आहेत तरी आपआपल्या धर्मानें जोंपर्यंत चालतात तोंपर्यंत आमच्या मेहरबानगीचें सुख त्याणीं भोगावें. हें रास्त आहे. सर्वांस महशूर व्हावें." या आज्ञापत्रा करितां शास्त्रीबावा मजपेक्षां आपले आभार सर्वांनीं अधिक मानावे. याचें उत्पत्तिस्थान आपण. मी उगाच कारण.

**शास्त्रीबावा**— लोकांच्या आशीर्वादांचा वर्षाव, आपणावर होवो ह्मणजे झालें.

**माधवराव**— सर्वांत मोठी गोष्ट ती करणें राहिलेंच. या साल आरंभीं तालुके फिरावयास गेलों होतों तेव्हां एक महा अनाचार दृष्टीस पडला. श्रीमंत लोक आपल्या सत्तेच्या बलेंकरून गरीब विचाऱ्यां दरिद्री कुणब्यांस हवें तेव्हां वेठीस धरून पैसा दिल्याशिवाय पाहिजे तितके लांब नेतात— त्यांच्या बायका पोरांची काय दुर्दशा उडत असेल— असें दिसल्यावरून तेव्हांच मी जिकडेतिकडे ही चाल बंद पाडावी ह्मणून सांगितलें; आणि येथें आल्यानंतर लेखी हुकूम पाठविणार होतों तें तसेंच राहिलें.

**रामशास्त्री**— तरीच एकून आपण पूर्वीं अशी आज्ञा केली होती. लेखी जरी नसली तरी कामगारांस ती मानणें भाग आहे. आतां नीट समजलों. काल वसई महालांतून अर्ज घेऊन लोक आले आहेत. ... सुभेदार विसाजीपंत आण्णा यांणीं त्या हुकुमा-

विरुद्ध आचरण केलें. त्यांणीं धरलेले बिगारी येथें आले आहेत. आपण आज्ञा केलेली मला ठाऊक नव्हती ह्मणून मी थोडा विचारांत होतों. परंतु आतां विसाजीपंतांनीं मोठा गुन्हा केला हें उघड आहे. त्यांस शिक्षा करणे ती श्रीमंतांनींच स्वतः येऊन करावी.

**माधवराव**— विसाजीपंतानें बिगारी धरिले? आणि तेंही माझ्या आज्ञेविरुद्ध! आपण उद्यां प्रथम परवाने तयार करून मोर्तबास पाठवा. मग दुसरें काम. त्या परवान्यांत साफ ल्याहावें कीं जब्रीनें बिगारी धरिल्यास फार मोठी सजा दिली जाईल. विसाजीपंतानें बिगाऱ्यांकडून जें सामान नेवविलें त्या सर्वांची जप्ती करून लिलांव करून टाका. जो पैसा येईल त्यांतून बिगाऱ्यांची वाजवी दस्तुरी देऊन शिवाय त्या गरिबांस नुकसानीबद्दल योग्य बक्षिसें द्या. बाकी उरेल तें तूर्त अमानत खात्यांत पडूं द्या. विसाजीपंतास तर कामांतून मह्कूब करा. असे दुष्ट लोक चाकरींत ठेऊन उपयोग नाहीं.

**रामशास्त्री**— एकदां त्यास क्षमा असावी.

**माधवराव**— नाहीं, न्यायाधीश, या कामांत मी आपलेंही ऐकणार नाहीं. रास्त आज्ञा मोडणें ह्मणजे काय आहे हें विसाजीपंतास व सर्वांस कळलें पाहिजे.

( घड्याळावरील माणूस येतो )

**घड्याळावरील**— तेरा घटका रात झाली या चवदा घटीचा अंबल हाय, माह्राज.

**रामशास्त्री**— श्रीमंतांस मी फार वेळ खोळंबविलें. आतां आज्ञा असावी.

**माधवराव**— बरें आहे; आपल्याशीं बोलत असतां दिवसाचा तास आणि तासाचें पळ होतें.

( निघोन जातात. )

## अंक ४ प्रवेश १.

बुधवार पेठ—गटारयंत्र.

**रामभट**— काय, शितारामभट, इकडे या इकडे या, आज कुठे टिळा लाविला ? तुमचा तर, बाबा, एक दिवस रिकामा नाहीं जात. आमचीं कपाळें पाहा सदां पांढरीं. आज कुठे शक्करभात झोडला.

**शितारामभट**— छे कुठला शक्करभात घेऊन बसलां, रामभट ? अहो तें तुह्माला. आज गणेशपंत चांभारगोंदेकराच्या बापाचें श्राद्ध होतें. अँः साधे गोळे होते नी काय— एकीकडून शिधा यावयाचा आहे तिकडे आतां निघालों आहें.

**रामभट**— ( धोतर ओढून ) याहो. शिधा येईल पुढें. अरे नारायणभट, हा चालला धर.

**नारायणभट**— कुठे चाललासरे, शितारामभट ? रामभट, हा धरला.

**रामभट**— वेडा, गांवांत काय बातमी चालली आहे, नी हा चालला शिधा आणायाला !

**शितारामभट**— गांवांत काय चाललें आहे ? तर मग बसतों गड्या. कायरे रामभट, गावांत काय चाललें आहे ?

**नारायणभट**— हा वेड्या, तुला का हींच कानाहीं ठाऊक ? ( याला, काय पाहून शिधा देतात रे ? ) गांवांत श्रीमंतांचे आज्ञेवरून ऊडेकोटतयारी चालली आ-
खालीं हैदरअल्ली ह्मणून कोणी आहे, त्याच्या-

वर स्वारी होणार. शिंदे, होळकर, गायकवाड, यांना आज्ञापत्रें गेलीं आहेत. आतां कायरे थाट! येथून तेथून चोहों बाजूंस लश्करांचीं लश्करें उतरतील.

**रामभट—** अरे उतरतील काय? येऊन उतरलीं.

**विदूषक—** ( मध्येंच ) तुमचें आतां फार उत्तम झालें. कोणाचे बाप मरतील, कोणाचे लेक मरतील, तितकीं तुमचीं श्राद्धें वाढलीं.

**रामभट—** मूर्ख बेटा काय बोलतो पाहा.

**विदूषक—** बोलतो बरोबरच. मग काय, रामभट लागले सांगायाला, करा, बापाय तरपंते, मुलाय तरपंते, दक्षणाय टाकंते.

**नारायणभट—** तरपंते, तरपंते ठीक! ही व्यक्ति कोठून आली हो येथें?

**शितारामभट—** कोठून आली कोण जाणे व्यक्ति पण व्यक्ति आहे.

**रामभट—** जाऊं द्या कीं. तो बडबड्या आहे. अहो, बरी आठवण झाली. भास्करपंत स्मार्त कांहीं अनुष्ठानें बसविणार आहेत. त्यांणीं मला ब्राह्मण आणायास सांगितलें होतें. चला तुह्माला नेतों. तेथेंही ही बातमी लागेल.

**विदूषक —** महाराजा, रामभट महाराजा, आह्मी येक ब्राह्मण आहे. मोठे विद्वान्. आपल्यापाशीं आले आहे. गांवीं आमचा बायको मेले. मूल मुसलमान झाले. घर जळून गेले. तेथून देशत्याग करून येथें आले. सोय झाली तर मोठा पुण्य लागेल. आह्मी येतो.

**रामभट—** अहो तुह्मी कोण? आतांच

च्यासारिखे बोलत होतां. आतां लागलेच तेलंग्या सारिखे बोलतां. तुमचें नांव, गांव, गोत्र सांगा. तुह्मालाही नेऊं. ब्राह्मणाची परस्पर सोय झाली तर त्यांत आमचें काय जातें ?

**विदूषक**— माझें नांव शामबक्ष. माझें गांव महंमदपुरी, माझें गोत्र रामभट.

**रामभट**— कोणरे तूं लुच्चा, अशी थट्टा करायास येथें आलास कायरे ? चरमी जोडा घेतला आहे काल. योग्यता पाहावी आणि बोलावें. वाळींत टाकून, शेणमार करून घालवून देईन ठाऊक नाहीं ?

**विदूषक**—नकोरे बाबा मला शेणमार. शेणमाराची भीति नाहीं फारशी, पण दुसऱ्यानें आंघोळ करावी लागेल याची भीति. आतांशीं आठआठ दिवसांनीं स्नान करायाचा बेत धरला आहे. मी आपला पळून जातों कसा. नको तो मला शेणमार.

( विदूषकजातो )

**सर्व**— काय विजातीय मूर्ति आली होती ही ! असो आपल्याला काय त्याशीं करायाचें आहे ? चला लवकर जाऊं.

( निघोनजातात )

## प्रवेश २.

शनवार वाड्यांतील हुजुर कचेरी.

माधवरावसाहेब पेशवे, त्रिंबकमामा, गोपाळराव पटवर्धन, मल्हारराव रास्ते, आपाबळवंत, नानाफडनीस, रघुनाथराव, सखारामपंत, माहादाजीशिंदे, तुकोजी होळकर, जयाजी गायकवाड, आणि पेशव्यांच्या पदरचे पुष्कळ सरदार.

( दरबार भरल्यावर )

**माधवराव—** मामा, दरबार भरविण्याचें या सरदारांस कारण सांगा.

**त्रिंबकमामा—** जी, ( सरदारांस ) सरदार मंडळीस मराठी बाण्याचें शौर्य दाखविण्यास आतां उत्तम प्रसंग आला आहे. कर्नाटकांत हैदरअल्लीनें फार नासाडी मांडिली आहे. कोणी वलंदेजी लोक त्यास सहाय्य असल्यामुळें तो आपला अपमान कर्ण्यास उद्युक्त झाला आहे. त्याच्या सरहद्दीनजीकचे जे आपले पाळेगार त्यांस त्यापासून बहुत त्रास होतो. तेव्हां जर आपणास आपलें नाव राखणें असेल, जर यवनाची सत्ता चालूं न देणं असेल, तर या वेळेस सैन्याची तयारी करून कर्नाटकांत जावें हें ठीक. ज्या पाळेगारांनीं आपणास मराठ्यांचे व पेशव्यांचे अंकीत ह्मणविलें आहे त्यांच्या संरक्षणार्थ हरतऱ्हा केल्या पाहिजेत. आह्मी त्यांजपासून करभार घेतों. कांहीं कारण लागल्यास त्यांस हुकूम करितों. आह्मी त्यांचे यजमान ह्मणवितों. मग त्यांजपासून फायदा करून घेण्यास जर आह्मी अधिकारी आहों तर संकट समयीं त्यांस साहित्य करण्यासही अधिकारी झालें पाहिजे. शिंदे, होळकर, गायकवाड, रास्ते, यांच्या सारिखे शूर महापराक्रमी सरदार मराठ्यांचे आहेत. असें असतां या हैदरअल्लीस आह्मास त्रास देण्यास धैर्य आलें हेंच नवल. ज्या प्रमाणें जवळ दाहापांच लहान लहान लेंकरें हांसत आनंद करीत बसलीं असतां बाप अधिक शोभतो त्याचप्रमाणें पुष्कळ पाळेगार व अंकीत असल्यानें राजा शोभतो. या गोष्टीचा पूर्ण विचार

वयासाठीं आज श्रीमंतांनीं हें दरबार भरविलें आहे.

**रघुनाथराव**— त्यास खंडणी देऊन त्याचें शांतवन केलें तर ?

**माहादाजीशिंदे**— काय दादासाब खंडनी ! त्या हायदराला ! या येळस माज्या आंगाचा तिळपापड जालाया. ह्ये बोलन आपल्यास्नीच सोबो. ( माधवरावास ) सायब, जोहार करतो. या चाकर मान्याला आज्ञा व्हावी. त्यो मुसलमान माज्या डोळ्यांतपुरी पासून सलतोया. ह्योपरानी (छातीवर हात ठेवून )जिवंत हाय त्यो पर्यंत त्येचा सुड उगवीन. दादासाब-आपन इसरला. हिंदुस्थानांतील म्होइम आपन इसरला. तित माजा बंदु पडला. ह्यो माजापाय तित तुटून पडला. तित पडलेल्या रक्ताच्यान मी त्या मुसलमानावर म्होइम करीन. आज्ञा मातर व्हावी. सायब आपल्या पायाच्या पुन्यान त्येचा जाऊन समाचार घ्येतो. त्येला. पायाजवळ धरून आनतो. आतां आतां मुसलमानानी लइ पुंडावा मांडलाया. माजा राग माज्या मदी मात नाहीं. दादासाब आपून पुना खंड असा सब्द उच्चारूनये.

**त्रिंबकमामा**— दादासाहेबांचा रोंख मी उमजलों. श्रीमंतांचे नातलग पडले ह्मणून कमजास्त बोलतां येत नाहीं. परंतु या पुरुषापासून खास मराठी राज्याची हानि होणार. दादासाहेब, आपण व आपले पुत्र अशा गोष्टीनें लोकांचे आपांसमात्र कारण व्हाल. मी बोललों याची मला आपण व श्रीमंतांनींही माफी केली पाहिजे. मी कारभार पाहतों ह्मणून मला असें बोलणें भाग आलें, मी पुनः माफी मागतों.

**[मा]धवराव**— ( उभयतांस) कलह करण्यास

ही संधी फार उत्तम पाहिली. आपण असे आपआप सांत भांडूं लागलों ह्मणजे हैदरास जिंकूं यांत संशय नकोच. तुकोजीहोळकर आतां तुह्मी बोला.

**तुकोजीहोळकर—** सायब मी तर ही तलवार लटकावूनशनी आलो हाय, आज्ञा मातर व्हावी. ही उपसूनशनी इचा पराक्रम करून दावतों. मला सरकार, ह्मेत्ये ठाउक न्हायी, येोक शिपाइ बाना मातर मी जानतों. आपल्या आन मातोसरी आइल्याबाईच्या पुन्यान ह्मोइम फते करून येतों. हयदर मराठीराज्यांत येऊनशनी दंगा करतो, मजीकाय. मला हुकूम व्हावदरकार काय त्येची येन्याची फुडे. सायेब माजा अरज इक्ताच.

**मल्हाररावरास्ते—** माझी विनंती ऐकावी. मराठे यश पावतील किंवा नाहीं हें आतांच समजून आलें. महादाजीशिंदे व तुकोजीहोळकर असे असे शूर सरदार जेथें मी मी ह्मणून जाण्यास अर्ज करितात तेथें आमचीं निशाणें विजयी होऊन हैदरअल्लीच्या मस्तकावर नाचतील यांत काय संशय ? पानपतच्या लढाई खेरीज ( ईश्वरेच्छेनें तें कसें झालें असेलतें असो ) त्या लढाई खेरीज आह्मास पराजयाची वार्ता एके ठिकाणीं तरी ठाऊक आहे काय ? श्रीरंगपट्टणाचा खंड कोणीं घेतला ? खडापा जवळ खर्पा व कर्नाळा या दोघां नवाबांचा पराजय कोणी केला ? बाहादुर गड कोणी घेतला ? निजामअल्लीचें मोर्तब कोणी घेतलें ? तेच हे मराठे. शिवाय याच हैदरअल्लीचा पराजय केलानाहीं कीं काय ? श्रीमंतांनीं आपणस्वतः स्वारीकरून खंडणी आणलेली आह्मी अझून [illegible]

लों नाहीं. तो हैदर ही विसरला नसेल. त्याच्या आंगावर शिंदे अथवा होळकर असे प्रतापी सिंव्ह कशाला पाहिजेत ? उत्तरेस हिंदुस्थानांत कित्येक उन्मत्तहत्तीसारखे दंगा करूं पाहतात, तिकडे त्यांणीं आपली चाल करावी. हैदर काय कपटी लांडगा आहे मी त्याचे पाठीस लागतों. कोणीकडे कसा पळतो तें पाहतों. शेतकरीबावांचा वडगा जों पर्यंत दृष्टीस पडला नाहीं तों पर्यंत शेताचीनासाडी करील. मला आज्ञा व्हावी. ती झाली कीं मी निघालोंच.

**माधवराव**— शाबास, महाविरानो शाबास. मराठी राज्याच्या संरक्षणाची भीति आतां कशास पाहिजे ? ही लढाई आह्मी उकरून काढली नाहीं. लढायांमध्यें अनेक लोकांचा संहार होतो, हें आह्मास पूर्तेपणीं ठाऊक आहे परंतु उपाय नाहीं. आमच्या वर जेव्हां त्याणें आपण होऊन प्रसंग आणला तेव्हां आपलें नांव राखण्यासाठीं लढाई करणें भाग आलें आहे. तुमचीही राज्यसंरक्षणार्थ उत्सुकता पाहून धन्य मराठे असें आमचे शत्रुही ह्मणतील. महादाजी आणि तुकाजी आपण वर हिंदुस्थानांत शांतता राखण्यास जावें. आणि त्रिंबकमामा व मल्हारराव यांस घेऊन मी स्वतः हैदरावर जातों. पानपतच्या लढाई पासून मराठ्यांची शक्ति क्षीण होत चालली असें निंदक ह्मणोत. आमचा तर विजयध्वज हे सरदार ( सर्वांकडे बोट दाखवून ) अधिकाधिक उंच उभारता हेत. मामा, याप्रमाणें तजवीज व्हावयाची. बंदोबस्त करावयास जिकडे तिकडे हुकूम द्या. कां सर्वांचे प-[illegible]प बेत आलाना ?

**सर्व**— सर्वांचे पसंतीस आला, परंतु आपण जावयाचें करूं नये. आपली स्वारी येथेंच असावी ह्मणजे ठीक.

**माधवराव**— नाहीं. आतां तेवढी गोष्ट बोलूं नका. बेत झाला तो झाला. आपण आतां आपआपल्या तुकड्यांत जावें हें नीट आहे— कोण आहे— कारखानीस,—

**कारखानीस**— आज्ञा सरकार. ( पान सुपारी वांटतो आणि नंतर सभा बरखास्त होत्ये. )

## प्रवेश ३.

( आंतला चौक )

रमाबाई, राधाबाई, सरस्वतिबाई, लक्ष्मीबाई.

**राधाबाई**— बाईसाहेब आज आपण अशा चिंतेंत कांबरें दिसतां ?

**रमाबाई**— कोण मी? नाहींगबाई चिंता कसली ?

**सरस्वतिबाई**— तें नका गडे बोलूं. तोंड उतरल्यासारखें दिसतें.

**लक्ष्मीबाई**— बाईसाहेब आतां नका लपवूं ? सांगाच, सुकलेली गुलाबाची कळी जशी दिसत्ये तशा आज आपण दिसतां. अशी फिक्कट मुद्रा आह्मी कधींच पाहिली नव्हती.

**रमाबाई**— खरें ह्मणाल तर माझ्या बाई जिवावर धोंडा आला आहे. स्वारी करायाला ह्मैसुराकडे जायाचें आहे. काय करूं, काल रात्रीं सांगूनसांगून दमल्यें. पण नाहीं, मनांत भरलें तें भरलें. मामा जाताहेत. मल्हारराव जाताहेत. मग आणखी आपण कशाला बरें गेलें पाहिजे ? खोकला बळकट झाला आहे. पण त्याचें

नांव तें ऐकायाचें नाहीं. कायकरावें बाई, असा हट्टी स्वभाव. प्रकृतीला जपणें ह्मणून ठाउकच नाहीं. जेव्हां तेव्हां ह्मणायाचें कीं राज्याचें चांगलें तें माझें चांगलें. शरिराला काय करायाचें आहे? असें ह्मटल्यानें बाई कुठें होतें? वास्तवीक ह्मणाल तर या काळजींत मी आहें.

राधाबाई— खरेंच. आमच्या येथें ह्मणायाचें कीं श्रीमंतच जाणार. शरिराला समाधान नाहीं, मग कशाला जावें बरें? पण बाईसाहेब आपण सुखीबाई. आपल्यासारखें दैव कोणाचें ही नसेल. काय एक रत्न सापडलें आहे. मागल्याजन्मीं हरताळका चांगल्या पुजल्या आपण.

रमाबाई— होयबाई. काय त्या स्वभावाचें वर्णनच करितां येत नाहीं. लोकांचें मन दुखिवणें तर ठाउकच नाहीं. मी हट्ट घेतला ह्मणजे झालेंच काम. आतां बाई मला कसें करमेल कोणजाणें.

लक्ष्मीबाई— इतकें हातांत आहेतना? मुठींत अगदीं?

सरस्वतिबाई— मुठींत ह्मणजे? बाई थोरांचें असेंच आहे; घांस घेणें झालें तर अगोदर बायकोची परवानगी पाहिजे. कांग घेउ? पाणीप्यायाचें झालें तरी कांग पिउं? मग प्यायाचें.

राधाबाई— तालिवारांच्या चालीच त्या.

रमाबाई— पुरेग तुमचें मेलें कौतुक, ही कां थट्टेची वेळ आहे?

लक्ष्मीबाई— आह्मीकां थट्टा करितों. खरें आहे तें सांगितलें.

( दासी आंतयेत्ये )

**रखमाईदासी—** बाईसाहेब, श्रीमंत मंदिरांत वाट पाहताहेत.

**राधाबाई—** च्या बाईसाहेब मत्यय.

**रमाबाई—** ( हांसून ) अगबाई मला सांगितलें होतें खरें. बायानों अतां मी तिकडे जात्यें. माझ्या ही जिवाला स्वस्थनाहीं.

( रमाबाईजात्ये )

**सरस्वतिबाई—** असा जोडा कोठें पाहिला न-व्हता. काय बाई त्यांची एकमेकावर जी प्रीति आहे ती कांहीं अतोनात. श्रीमंत खोंकले कीं बाईसाहेबां-चा जीव घाबरला. बाईसाहेबांना कोठें शिंक आली कीं लागले श्रीमंत आंत बाहेर खेपा घालायाला. आ-ले पांच चार वैद्य.

**राधाबाई—** नाहींतर तुमचें आमचें. मेलें दिव-सभर काम करकर करावें, आणि मग रात्रीं तरी गोड बोलणें आहेका ? तेव्हांही एकाचें तोंड पूर्वेस तर एकाचें उत्तरेस.

**लक्ष्मीबाई—** खरेंचगडे. आह्मीच काय पापकें-लें होतें कोण जाणें. आठवड्यांतून साहा दिवस तर आमचे मेले संतापांत आणि रागांत जातात.

**राधाबाई—** ह्मणूनच चला आतां घरीं जाऊं. आज आमचा गोडीचा दिवस आहे.

( निघोन जातात )

## प्रवेश ४.

रमाबाईचा शयने माहाल.

रमाबाई व माधवराव.

**माधवराव—** कां महाराज, देतांना आतां रजा ? फार दिवस नकोत. महिन्याच्या आंत येथें पुनः या मंदिरांत बसायाला तयार.

**रमाबाई—** रजा काय द्यायाची. पण माझें गडे येवढें ऐकायाचें होतें, कांहीं गेलेंच पाहिजे असें नाहीं. खोकला झाला आहे, प्रकृत बिघडली आहे, पणबाई बोलावें कोणीं.

**माधवराव—** तुह्मी. प्रकृतीचें असो, पण मी तुह्माला सोडून उगीच दुसरीकडे जायाचें ह्मणून जाईन? गादीवर बसायाला पाहिजे आणि मग लढाईत शिरायाला कांनको ? जाणें भाग आहे ह्मणून जातों. लोकांनीं आतां जर मजकडे पाहूं नये तर कोणाकडे पाहावें बरें. तुह्मीच पाहा.

**रमाबाई—** ह्मणून काय झालें ? गेलेंच पाहिजे असें नाहीं कांहीं. आतां वाटेनें काय ? कोणी बोलणारें नाहीं कांहीं नाहीं. गारपाण्याचीं स्नानें होतील. सकाळच्या प्रहरीं फराळ व्हायाचा नाहीं. पाहा बरें सांगून ठेवलें आहे. नकोबाई मी तरी येन्यें बरोबर.

**माधवराव—** ठीकठीक, मग फार उत्तम सोय.

**रमाबाई—** जळलें मेलें हेंच तें. मी ह्मटलेलें मनासनाहींच यायिचें. असल्यें मी बरोबर ह्मणून काय होतें ?

**माधवराव—** व्हायाचें काय ? एवढ्याकरितां नेत नाहीं; मागें व्यवस्था पाहण्यास कोण ?

**रमाबाई—** पुरेपुरे लाडीगोडीचें बोलणें.

**माधवराव—** बरें तसें ह्मां होईना. लाडीगोडी केली पाहिजे. बायकांच्या रागांना देव देखील भ्याले

मग आमची ती काय कथा. लाडी गोडी केली नाहीं तर होतें कसें ?

**रमाबाई**— माणसानें काय बोलावें बाई आतां ?

**माधवराव**— बरें आहे, जा ह्मणून बोलावें. दुसरें काय बोलायाचें आहे ?

**रमाबाई**— जा तर जा. तर काय आणखीं. माझें कधीं एकदां तरी ऐकिलें आहेका ? मी मेली उगीच वेडी ह्मणून हट्ट घेत्यें.

**माधवराव**— आमचें काम झालें. रजा मिळाली पण मागें व्यवस्था मात्र नीट ठेवा. मी तुह्माला शिकवावें असें नाहीं. तुह्मीच मला शिकवाल पण आपलें सांगून ठेवतों. आपल्याला सर्व जें कांहीं करण आहे तें लोकांकरितां. त्यांना जर सुख होत नाहीं तर आह्मी कशाला ? आह्माला काय जन्मतांच देवानें मोठेपणाचा शिक्का मारला आहे ? आह्माला काय दोन तोंडें आहेत ? का दोन नाकें आहेत, का दोनशिंगें आहेत ? त्यांणीं मोठेपणा दिला ह्मणून आह्मी मोठे. भगवान् रामचंद्र देखील ह्मणाले कीं मी लोकांकरितां अवतार घेतला. पाहूं बरें कशी व्यवस्था ठेवितात ती.

**रमाबाई**— मी ह्यावी तशी ठेवीन जा. राहायाचें तर नाहींना ?

**माधवराव**— रामशास्त्रीबावा आहेतच. कांहीं मोठें काम करणें झालें तर त्यांस विचारीत जा ह्मणजे झालें.

**रमाबाई**— पण परत येणें कधीं होईल. मकृतीला बाई फार जपलें पाहिजे.

**माधवराव**— होहो. मकृतिमकृति ह्मणजे क

एक बाऊच केला आहे. काय करावें. मी सुखानें का· तुह्माला सोडितों. मला तर सोडून जाऊं नये असेंच वाटतें, परंतु निरुपायाची गोष्ट. या तोंडाकडे पाहिलें ह्मणजेच चित्त रमण होतें. रमा खरीच.

**रमाबाई**—अग बाई ताळच सोडला.

**माधवराव**— बर तर आतां जातों, पण अगोदर एक साखरेचा—

**रमाबाई**— काय हें वेड लागलें. साखरेचा! बोलायाला तरीं कांहीं वाटतें ?

**माधवराव**— वाटायाचें काय, येतों.

( मुका घेऊन माधवराव जातो )

**रमाबाई**— ( आपल्याशींच ) हे करवीरचे अंबाबाई, कुलस्वामिणी, तुझी नाक दुरई काढीन. तुझ्या नावानें सहस्रभोजन घालीन. जय होवो, प्रकृति न बिघडो. मला आज अनुकूळ आहे. हे तुळजापुरचे आई तुझ्या यात्रेला ओहोरानें येईन. जय आई पर्वती संभाळ तूं आतां तूंच आमची आहेस· कोणी बाहेर आहे कां गेदासी ?

**दासी**— काय बाईसाहेब ?

**रमाबाई**— देवडीवरून जासूद पाठवून शास्त्रीबावांकडे सांगून पाठीव कीं पर्वतीवर अनुष्ठानें बसवायास मी सांगितलें आहे. तसेंच ह्मणावें सप्तशतीच्या पाठासाठीं ब्राह्मण बसवा.

**दासी**— आज्ञा महाराज

( निघून जात्ये )

**प्रवेश ५.**

**रस्ता— जनार्दनपंत व कृष्णाजीपंत.**

**जनार्दनपंत**— नमस्कार कृष्णाजीपंत. कशी काय बातमी ? लढाईची काय बातमी आली आहे ?

**कृष्णाजीपंत**— लढाइची बातमी काय. श्रीमंतच गेले होते तेथें काय पुसावें ? जशी राज्यकारभारांत दक्षता तशीच लढाईत. त्यांणीं हैदराला अगदीं जेरीला आणला. अखेर त्याणें तह केला. हें पाहा तेथील एका व्यापाऱ्याचें पत्र आलें आहे. वाचा येथून.

( उघडून त्याच्या हातीं देतो )

**जनार्दनपंत**— ( मोठ्यानें वाचतो ) " तुह्मास कळविण्याजोगी आमच्याकडे बातमी ही आहे. हैदरानें तहाचें बोलणें लाविलें. त्यास श्रीमंतांचे आज्ञेवरून मामासाहेब कबूल झाले. तो तह ऐसाजे " पूर्वीं छत्रपति शिवाजी महाराज यांचे वेळेस कर्नाटकाचा जितका भाग मराठ्यांकडे होता तितका आतांही असावा. खेरीज मदगिरी आणि गरमकोंडा हे दोन्ही किल्ले त्यांजकडे असावे, खेरीज तूर्त लश्कर खर्चाबद्दल मराठ्यांस छत्तीस लाख रुपये पोंचावे. खेरीज दरसालीं चौदा लाख रुपये खंडणी ह्मणोन द्यावे. यास अंतर होऊं नये. " ( कांहीं थांबून ) एकून असें झालें, हैदराच्या उदयचंद्राआड ढगें आलीं. शाबास, मोठी आनंदाची गोष्ट. जिकडे तिकडे आतां लोक खुशालतील.

**कृष्णाजीपंत**— ( उसासा टाकून ) पण दुसरी बातमी तुह्मी नाहीं ऐकिली. हिजपासून जितका आनंद झाला तितकेंच किमाजपक्ष अधिक तिजपासून दुःख होईल. भगवान् त्या पुरुषाचें संरक्षण करो.

जनार्दनपंत— कायहो काय ह्मणतां, मी नाहीं समजलों.

कृष्णाजीपंत— श्रीमंतांना कफोद्भव होऊन प्रकृति अत्यंत बिघडली आहे. तूर्त स्वारी थेउरास आहे. काल रमाबाईसाहेब तावडतोब निघोन गेल्या. असा प्रकार आहे. नाहींतर हैदर येव्हां धुळीस मिळाला असता.

जनार्दनपंत—असें काय? अरेरे? या दुःखाखालीं तो आनंद रसातळांत बुडाला. देवा, त्या जिवाचें संरक्षण कर. कृष्णाजीपंत,तो प्राणी गेला तर दुसरें तर काय परंतु केवळ महाराष्ट्राचें आज कुंकूं गेलें असें समजावें.

कृष्णाजीपंत— वास्तविक. माधवराव गेले असतां आमच्या देशाचा प्रकाशदाता सूर्यनारायणच अस्तासगेला यांत संशय नाहीं.

जनार्दनपंत— आयुष्याची जर वांटणी करितां येती तर माझें मी निमें आयुष्य त्या दयावंत प्रजापालकास दिलें असतें.

कृष्णाजीपंत— तसें होईल तर माझें मी पाउण आयुष्य द्यावयास आतां या क्षणीं तयार आहें. अरे, पण असे दुर्विचार आमच्या मनांत कां उभे राहतात? ईश्वर सर्व दुर्विघ्नें नाहींशीं करो. मी तर श्रीमंतांच्या दर्शनास आतां थेउरास जाणार.

जनार्दनपंत— चला मी ही येतों. अशा धन्य पुरुषाचे दर्शनासारिखा अवांतर कोणता लाभ आहे ? चला. ( निघोन जातात )

## प्रवेश ६.

### थेउर राजवाडा.

माधवराव, नारायणराव, रघुनाथराव, सखारामपंत, वैद्य, आणखी दुसरे पुष्कळ बडे लोक.

**सखारामपंत व रघुनाथराव** — ( बाहेरून येऊन ) श्रीमंतांची प्रकृति आतां कशी आहे ?

**वैद्य**— हळू;— आतां येऱ्हां थोडी उगीच डुलकी लागली आहे. बसावें.

**सखारामपंत**— ( रघुनाथरावास ) हळू, निद्रा लागली आहे. बरेंच आहे.

**रघुनाथराव**— होहो. निद्रा चांगलीच.

( माधवरावास स्वप्न पडतें. )

स्वप्नामध्यें प्रथम तीन विमानें स्वर्गाहून खालीं उतरतात. एकांतून लक्ष्मीनारायण, दुसऱ्यांतून ईश्वरपार्वती आणि तिसऱ्यांतून ब्रह्मासावित्री असे येतात. त्यांजबरोबर चवथें रिकामें विमान उतरतें. मागून गंधर्व गायन करीत येतात. माधवराव त्या सर्वांस साष्टांग नमस्कार घालतो व ते त्यास अनुक्रमें आशिर्वाद देतात. त्याच्या मस्तकावर हात ठेवितात, नंतर त्यास आलिंगन देऊन पुनः आशिर्वाद देतात. शेवटीं रिकामें विमान व पांच गंधर्व खेरीज करून बाकी सर्व पुनः स्वर्गास निघोन जातात. तें विमान व पांच गंधर्व अदृश्य होऊन तेथेंच राहतात. इतकें झाल्यानंतर माधवराव जागृत होतो.

**माधवराव**— सर्व गेले ? त्यांच्या दर्शनानें मला किती आनंद झाला. दैवहीन, अभागी, मी; मीच कसा येथें राहिलों ?

**वैद्य**— नाहीं श्रीमंत, सर्व येथेंच आहों. आमच्या हातून सर्कारचाकरींत तिळमात्र अंतर पडावयाचें नाहीं.

**माधवराव**— तुह्मी आहां ठीक आहे. परंतु मी तुह्मास बोललों नाहीं.

**वैद्य**— तर श्रीमंत आह्मांशिवाय दुसरें कोणी येथें आले नव्हते.

**माधवराव**— कोणी नव्हते ? तर मग त्या देवाधिदेवांनीं मला स्वप्नांत दर्शन दिलें काय ? हे भगवान् लक्ष्मीनारायण, हे ईश्वरपार्वती, हे ब्रह्मासावित्री, महान्महान् संतांस ज्या पदांचें दर्शन अलभ्य, तीं पदें आज माझ्या दृष्टीस पाडिलीं. त्या पदांचीं चिन्हें आज माझ्या खोलींत उमटलीं. हे प्रभो, मी दास होऊन गायन करीत बरोबर आलों असतों. मला कां टाकून गेलां ?

**रघुनाथराव**— हें काय बोलतां माधवराव !

**माधवराव**— दादा केव्हां आलां ? मला स्वप्नांत त्या देवतांचें दर्शन झालें. त्यांनीं आशिर्वादही दिले. ह्मणून असें ह्मणतों.

**सखारामपंत**— स्वप्न फार उत्तम आहे. श्रीमंतांनीं दुखण्याची काळजी करूं नये.

**माधवराव**— सखारामपंत, या दुखण्यांतून मी आतां बरा होईन ही आशाच नको. माझा अंतकाळ समीप आला. तुमच्या आमच्या गांठी तास अर्धतास पर्यंतच. या अंतकाळींच्या दुखण्यापासून मला किंचित् ही दुःख होत नाहीं. मी जरी पाप्यांचा राजा आहें तरी आतां त्या स्वप्नापासून मला आश्वासन प्राप्त झालें आहे. मजकडे भगवंतानें दृष्टि देऊन मला पाप

विमुक्त केलें आहे. मी आतां या क्लेशस्थानापासून निष्कलंक आनंद ज्या ठिकाणीं नांदतो त्या ठिकाणीं चाललों. वैकुंठीच्या राण्याजवळ चाललों. त्या ठिकाणीं नारायणाचें अखंडित भजन पूजन करीन. तेंच माझें जीवन होईल. हे यमा तुझा पाश कोठें आहे मला तर मुळींच भासत नाहीं. पाहा दादा, सखारामपंत पाहा. माझे पाय गार पडत चालले.

**सखारामपंत**— श्रीमंत, अशी दुष्ट वाणी कां उच्चारितां ?

**रघुनाथराव**— माधवराव, अगोदरच आमच्या छात्या फुटल्या, आणि वर शब्दांचे वज्रघात नकोरे बाळा मारूं.

**माधवराव**— माझ्याविषयीं तर मला कांहींच वाटत नाहीं. परंतु दादा, तुह्मास एक गोष्ट सांगणें आहे. नारायणा, इकडेये ( त्याचे डोळे पुसून ) हावेड्या. दादा याजकडे पाहा. या मुलाचा सांभाळकरा. माझ्या हातून लोककल्याण व्हावें तसें झालें-नाहीं. याच्या हातून तरी करवा. मी सांगावें असें नाहीं. परंतु काय करूं राहवत नाहीं. तुह्मा उभयतांचें एकचित्त असल्यास, तुमचा स्नेह उत्तरोत्तर दिवसेंदिवस वृद्धिगत होत गेल्यास आपल्या कुळाचें नांव चिरकाळ राहील. सखारामपंत, तुमच्या सारिखे कारभारी आतां यांना मिळणार नाहींत. घ्या हें शिक्का मोर्तब घ्या, आजपासून राज्याचे कारभारी तुह्मी व्हा.— आतां माझ्यानें बोलवत नाहीं. पाहा तें विमान व गंधर्व माझी वाट पाहात उभे आहेत. ( माधवरावास गंधर्व दिसूं लागतात ) जाऊं द्या, आतां

मला जाऊं द्या. एकदां तिच्याशीं बोलायाचें होतें. परंतु ती तर मूर्छा येऊन पडली आहे. किंवा मजबरोबर येण्याचा निश्चय करून त्यासतीनें देह ठेविला, कोण जाणें—होय गंधर्व माना डोलवितात. शाबासबाई; आतां आपण उभयतां त्या सच्चिदानंदाच्या आनंदांत मिळून जाऊं. येतों येतों आतां निघतों. माझी प्रजा सुखीराहो. दादा, अंतकाळींचे माझे आशिर्वाद त्यांस कळवा. माझें उत्तरकार्य नीट होऊं द्या. नारायणा रडूं नको. दादा रडूं नका. सखारामपंत हें काय ? तुह्मी सुखी असा, हें सर्व राज्य सुखी असो. माझें चित्त कोणी ढळवूं नका. मी आतां बोलणार नाहीं. हे भगवान् ! राम — राम— राम— ( अखेर मोठ्यानें ) राम.

( प्राणजातो )

## प्रवेश ७.

आंतल्या बाजूची खोली.

रमाबाई मूर्छा येऊन पडली आहे. रमाबाईची आई, आनंदीबाई, आणखी दुसऱ्या बाया जवळ बसल्या आहेत. कांहीं अंतरावर सखारामपंत, रघुनाथराव, अणखी कित्येक येऊन बसतात.

**जवळच्याबाया**— बाईसाहेब सावध व्हा. सावध व्हा, लोक एका संकटांत आहेत तों हें दुसरें उभें राहिलें. बाईसाहेब—( असें ह्मणून एकच आकांत करितात. )

**सखारामपंत**— बायांनों, इतका आकांत करूं नका. अशानें त्या शुद्धीवर येणार नाहींत. गलबा कमी करा. हे देवा, काय हें.

**रमाबाई** }— नाहींहो सखारामपंत. ती शुद्धी-
**चीआई** }वर येत नाहीं. माझो बाई चालली चालली. आतां मी काय करूं? दोघांनाही माझा कसा कंटाळा आला. बाईबाई माझ्यावर आकाश गडगडून पडलें.

**रमाबाई**—( सावध होऊन ) जळो माझें दैव. मी चांडाळिण कशी जन्मास आल्यें. आज मला सोडून कसें जाणें झालें. हे तुळशीआई मी कोणतें पाप केलें. रेदेवा आज मजवर हा कसा प्रसंग आणिलास? हा दिवस पाहाण्यास मी कशी वांचल्यें. पती पूर्वी ज्या सवाष्णी मरतात त्या धन्य होतात. आतां मी काय करूं? हाय हाय एकही आज्ञा मी भंगिली नाहीं एकही वांकडा शब्द मी बोलल्यें नाहीं. आतां मी कसे दिवस कंठूं? हे माते धरित्री, घे, मला अनाथाला तूं आपल्या पोटांत घे.

**आई**— धरा आवरून धरा. तिला देहाची शुद्धि नाहीं. बघा असा हंबरडा फोडूं नको. मज ह्मातारीवर दैव कसा कोपला?

**रमाबाई**— आई आतां मी येथें राहात नाहीं. माझ्या शिवाय घटका भर करमत नव्हतें. मलाही करमत नव्हतें. यासाठीं मी जात्यें, मी बरोबर जात्यें. मी सहगमन करत्यें. माझे अवयव मात्र येथें आहेत. जीव सगळा त्या शरीरांत घुटमळला आहे. झाला हाच माझा निश्चय. मी बरोबर जाणार. करा माझी तयारी करा.

**इतरबाया**—बाई साहेब असें करूं नका. दैवानें व्हावयाचें तें झालें. आह्मास धनी नाहींसे झाले;

आणि आमची धनीणही कां नाहींशी करितां ?

**आई—** नको नको. मग माझा प्राण कसा राहील. घरधनी गेले तेव्हां तुह्मी दोघे होतां. आतां त्यांनींही सोडिले. माझे आई तूं तरी सोडूं नको. तूं तरी राहा. तुमच्या सर्वांच्या दुःखाचा भार मी ह्याताारी कसा वाहूं. ऐकऐक. पुरे. नको हट्ट धरूं.

**रमाबाई—** आई असें भलतेंच सांगूं नको. तुझें ह्यातारपण झालें आहे. संसारांतील दुःखांतून तूं लवकरच मुक्त होशील. परंतु माझें आतांसें तारुण्य आहे, मी जर आतां तुजकरितां राहिल्यें, तर मग एक दोन वर्षांनंतर तूं गेलीस ह्मणजे मग हे पाय तर अंतरलेच पण तूंही अंतरशील. मग निराधारी, निराश्रित, हें काळें तोंड घेऊन, वैधव्य पदरीं बांधून लपण्यास देखील जागा उरणार नाहीं. आतां गेल्यें तर लोकांत कीर्ति करून जाईन. मग गेलें तर मजकरितां कुत्रा देखील रडणार नाहीं. आई या मायापाशांत तूं पडूं नको; करा माझी तयारी करा. आणागे माझें पांढरें पातळ, आणून मला नेसवा. माझी दागिन्याची पेटी आणून सर्व अलंकार मजवर घाला. माझा कुंकवाचा डबा आणून मला मळवट भरा. ओंटीचें तबक आणून माझी ओंटी भरा. मला जाऊन लवकर भेटूं द्या. जलदी करा माझी वाट पाहाणें होत आहे. अंबाबाईनें विमान पाठविलें आहे. ( तिला विमान दिसूं लागतें ) बरोबर गंधर्व आहेत. विमान माझीच वाट पाहात आहे. आटपा मी निघाल्यें.

( सर्व तयारी झाल्यानंतर स्वाऱ्या निघतात. )

## प्रवेश ८.

### दहनाचें ठिकाण.

**ब्राह्मण—** चिता रचिली. आतां प्रवेश करण्याचा समय आला.

**बाया—** बाईसाहेब दया ठेवा. आपण अक्षय सुख भोगण्यास चाललां. दया ठेवा.

**रमाबाई—** सुखी असा. आपआपल्या पतीसहवर्तमान सुखी असा.

**रघुनाथराव—** रमाबाई चाललीस बया ? तूं आपल्या देहाचें सार्थक केलेंस. आह्मालामात्र दुष्पट दुःख होतें.

**रमाबाई—** मामाजी नमस्कार करित्यें.

**नारायणराव—** वैन्ही तुह्मी चाललां ? मी नमस्कार करितों; आतां मी वैन्ही ह्मणून कोणाला हाक मारूं ?

**रमाबाई—** भाओजी, जा आतां राज्यकरा. तुमच्याकडे पाहून तरी लोकांना आमची आठवण होवो, त्यांस आमचा विसर पडेल असें करा.

**नारायणराव—** नको, मला तें राज्य नको, तीमजा नको, तो जीव ही नको.

**रामशास्त्री—** हे सुपतिव्रते रमाबाई, धन्य जोडा स्त्रीजातीला तूं भूषण खरी. नको. तूं नमस्कार न केलासतरीं चालेल, तुलाच आह्मी नमस्कार करावे. हे देवी, देव तुजवर पुष्पवृष्टि करोत.

**रमाबाई—** मी सर्वांना नमस्कार करित्यें— हे भगवान् नारायणा, वसिष्ठअरुंधतीच्या दर्शनासाठीं, स्वर्गीं पतिसहवर्तमान अखंडवर्षें वास करण्यासाठीं,

सासर व माहेर हीं दोन्ही कुळें उद्धरण्यासाठीं, आमच्या हातून जे अन्याय, ज्या हत्या, झाल्या असतील त्यांच्या निवारणासाठीं, मी आज पतीशीं सहगमन करित्यें. हे इंद्र, चंद्र, सूर्य, अग्नि, वायो, कृपा असों द्यावी. हे राजाधिराज यमधर्मा आपलीही कृपा असावी. ( लोकांना ) येत्यें आतां. आमच्या प्रीतींत जसा भंग होणार नाहीं तसा तुमच्यांत ही न होवो. येत्यें.

( प्रवेश करित्ये )

लोक— गेली गेली विश्वजननी, आमची मातोश्री गेली. आज आमच्या राज्याची लक्ष्मी गेली, शोभा गेली. आज आमच्या संकटांस आरंभ झाला. धन्यधन्य हे माउली तूं धन्य. तुजविण आम्ही परदेशी झालों. आतां आमचें कोण पालन करील तें करो.

( सर्व दुःख करीत निघून जातात. )

---

समाप्त.